


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३१-५७/३७ पाने ८ किंमत ३ रुपये अहिल्यानगर, सोमवार दि. २०.०४.२०२६ अंक नं. १७ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020



फायदाच फायदा !

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव,
सर्वात कमी मजुरी.

दागिन्यांची
प्रतीग्रॅम मजुरी
₹ 888/-*

Conditions Apply*

पाहिजेत

सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.

कॅशियर जागा : 2 (पुरूष)

कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.

पगार : 18000/- ते 19000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा

इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह
शनिवार ते मंगळवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.

चंदुकाका ज्वेल्स

शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



ADVANCED, AFFORDABLE, ACCURATE

अत्याधुनिक, परवडणारे व अचूक

नगर जिल्ह्यात प्रथमच..लवकरच आपल्या सेवेत

फक्त ५ मिनिटात

Ai basis 3 T. MRI, 128 Slice CT Scan

IN OPEN MRI
रु.~~10,000/-~~ ची तपासणी

फक्त रु.2200/-

वैशिष्ट्ये : * ॲडव्हान्स व आधुनिक मशिनद्वारे तपासणी * तज्ञ डॉक्टरांच्या टिमकडून रिपोर्ट
* वेळ व पैशाची बचत * २४ तास तत्पर व विनम्र सेवा.

ॲक्युरेट डायग्नोसिस सेंटर

सिटीकेअर हॉस्पिटल कॅम्पस, तारकपूर बस स्टॅण्ड समोर, अहिल्यानगर.

डॉ. रणजित सत्रे M. 93251 32736



एक अगरबत्तीचा सुवास
दरवळेल दूरवर....
प्रिमियम मसाला अगरबत्ती
इंडियन कस्तुरी

Indian Kasturi

इंडियन कस्तुरी म्हणजे
असली कस्तुरी
४५ ग्रॅम व २५० ग्रॅम
मध्ये सर्व पुजा साहित्य
दुकानात उपलब्ध
आजच मागणी करा
अगरबत्ती होलसेल व रिटलसाठी
केवल अगरबत्ती
आडते बाजार, हॉटेल रसरंग समोर, अ.नगर


आधार...
सदैव आपल्या
आठवणींचा..



## आदरणीय स्व. अरुणकाका जगताप

माजी आमदार, महाराष्ट्र विधानपरिषद

काका, आजही तुम्ही आमच्या सोबत आहात,

॥ प्रथम पुण्यस्मरण ॥

निमित्त आपल्या पावन स्मृतीस

भावपूर्ण श्रद्धांजली..

श्री. भानुदास एकनाथ कोतकर

श्री. संदिप भानुदास कोतकर श्री. सचिन भानुदास कोतकर श्री. अमोल भानुदास कोतकर

**समस्त कोतकर परिवार**


SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES

Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite

सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999








# स्व. अरुण (काका) जगताप

यांना प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त

## विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली!

आपल्या कार्यातून समाजात निर्माण केलेला विश्वास आणि प्रत्येकाशी
जपलेला जिव्हाळा यामुळेच ते सर्वांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करून गेले.
त्यांची साधी, प्रामाणिक आणि माणुसकीची वाटचाल नेहमीच सर्वांसाठी प्रेरणादायी राहील.

विनीत

**डॉ. राधाकृष्ण विखे पाटील**
जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ)
महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री अहिल्यानगर

**डॉ. सुजय विखे पाटील**
प्रदेश उपाध्यक्ष भाजपा,महाराष्ट्र

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगरमधील हॉस्पिटलमध्ये सुमारे १८ लाखांची अफरातफर; ॲडमिन तथा कॅशियरविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील माळीवाडा भागातील सरस्वती हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांचा विश्वासघात करून सुमारे १८ लाख रुपयांचा अपहार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी हॉस्पिटलचे संचालक डॉ. अमोल सुरेश जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात हॉस्पिटलचा ॲडमिन तथा कॅशियर विष्णू जगन्नाथ शिरसाट याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी विष्णू शिरसाट हा एप्रिल २०२५ पासून सरस्वती हॉस्पिटलमध्ये डमिन आणि कॅशियर म्हणून कार्यरत होता. हॉस्पिटलच्या दैनंदिन कामकाजाची आणि बिलांची जबाबदारी त्याच्यावर सोपवण्यात आली होती. मात्र, मागील वर्षभरातील बिलांच्या हिशोबात तफावत असल्याचे व्यवस्थापनाच्या लक्षात आले. संशय आल्याने हॉस्पिटलच्या टीमने मार्च २०२६ मध्ये संपूर्ण हिशोबाची पडताळणी केली.

या तपासणीत कॅशियर विष्णू शिरसाट याने संगनमत करून आणि विश्वासाचा गैरफायदा घेऊन तब्बल १८ लाख रुपयांची अफरातफर केल्याचे स्पष्ट झाले. डॉ. जाधव यांनी या रकमेबाबत विचारणा केली असता, आरोपीने पैसे देण्यास असमर्थता दर्शवली.

हॉस्पिटलची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याने अखेर पोलीस ठाण्यात धाव घेण्यात आली. कोतवाली पोलिसांनी या प्रकरणी आरोपी शिरसाट याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६ (२) नुसार गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पोलीस हवालदार राजेंद्र औटी करत आहेत.

# नगर शहर परिसरात महिलांच्या गळ्यातील दागिने चोरण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ

## धार्मिक कार्यक्रमात तसेच रस्त्याने पायी जाताना केले जातेय लक्ष, चोरटे पोलिसांना सापडेनात

नगर – नगर शहर परिसरात महिलांच्या गळ्यातील दागिने चोरण्याच्या घटनांत गेल्या काही दिवसांत मोठी वाढ झाली आहे. रस्त्याने पायी जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसका मारून तोडायचे आणि दुचाकीवर भरधाव वेगात पसार व्हायचे अशा प्रकारच्या चेनस्नॅचिंगच्या घटना गेल्या काही दिवसांत घडल्या आहेत. तसेच हे सत्र अद्यापही सुरूच आहे. याशिवाय सध्या उन्हाळा सुरु असल्याने अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्यक्रमात गर्दीचा फायदा घेत महिलांचे दागिने चोरीला जाण्याच्या घटना ही वाढत आहेत.

गेल्या महिनाभरात शहर परिसरात अशा अनेक घटना घडल्या असून त्याबाबत शहरातील विविध पोलिस ठाण्यात गुन्हेही दाखल झालेले आहेत. मात्र यातील एकाही गुन्ह्यातील आरोपीला पकडण्यात शहर पोलिसांना अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे चोरटे जोमात तर पोलिस कोमात असे म्हणण्याची वेळ आली आहे. या बरोबरच चोऱ्या घरफोड्या, फसवणूक, लुटमार या घटनाही सुरूच आहेत. शहराच्या मध्यवर्ती भागासह विविध उपनगरात रात्रीच्या वेळी चोऱ्या, घरफोड्या होत असल्याने नागरिकांनाच रात्रभर जागून गस्त घालावी लागत आहे. या चोऱ्या, लुटमारीच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांसमोर मोठे आव्हान या चोरट्यांनी उभे केले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### धार्मिक कार्यक्रमात महिलांच्या गळ्यातील दागिन्यांची चोरी

सावेडी उपनगरातील गंगा उद्यान परिसरातील मैदानात सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेच्या कार्यक्रमात चोरट्याने हात साफ केला आहे. गर्दीचा फायदा घेत चोरट्याने काही महिलांच्या गळ्यातील सुमारे साडेचार तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संगीता संजय आगलावे (वय ३९, रा. श्रीरामनगर, कॉटेज कॉर्नर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी आगलावे या १७ एप्रिल रोजी रात्री ८ ते ९ वाजेच्या दरम्यान मैत्रिणींसह गंगा उद्यान जवळील मैदानात भागवत कथा ऐकण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी परिसरात भाविकांची मोठी गर्दी होती. या गर्दीत चोरट्याने फिर्यादी महिला व त्यांच्या मैत्रिणींच्या गळ्यातील २ तोळे वजनाचे सोन्याचे मोठे गंठण, १३ ग्रॅम वजनाचे लहान गंठण आणि १३ ग्रॅमचे मंगळसूत्र असा मुद्देमाल लंपास केला. दागिने चोरीला गेल्याचे लक्षात येताच महिलेने तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करीत आहेत.

### मिरावली पहाडावर महिलेच्या गळ्यातील दागिने लंपास

मिरावली बाबा पहाड परिसरात एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सुमारे एक तोळ्याची सोन्याची पोत चोरट्याने लांबवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रंभाबाई रिकामे (वय ७०, रा. राजापूर माठ, ता. श्रीगोंदा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी १७ एप्रिल रोजी दुपारी साडेतीन ते संध्याकाळच्या दरम्यान मिरावली बाबा पहाडावर दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून त्यांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची पोत चोरून नेली आहे.

### भररस्त्यात महिलेच्या गळ्यातील दागिने पळविले

शहरातील विनायकनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर दोन दुचाकीस्वारांनी एका महिलेशी झटापट करून त्यांच्या गळ्यातील ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे पेंडल आणि मणी जबरदस्तीने हिसकावून नेले. ही घटना १८ एप्रिल रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास चंदन इस्टेट जवळील मनाबाई चाळ परिसरात घडली.

याबाबत सविता योसेफ उबाळे (वय २८, रा. पवार चाळ, विनायकनगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी उबाळे या १८ एप्रिल रोजी रात्री पायी घरी जात असताना विनायकनगरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर समोरून आलेल्या मोटारसायकलवरील दोन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले. गाडीच्या पाठीमागे बसलेल्या आरोपीने अचानक त्यांच्या गळ्यावर हात टाकून दागिने ओढण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी प्रतिकार केला असता, चोरट्याने त्यांच्याशी झटापट करून मारहाण केली आणि सोन्याचे दागिने घेऊन वेगात पळ काढला. या प्रकरणी उबाळे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सनातन धर्मसभा गायत्री मंदिरतर्फे

# नगरमध्ये २१ एप्रिलला 'सामुदायिक मुंजी'

नगर – सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षी शंकराचार्य जयंती निमित्ताने सामुदायिक (उपनयन) मुंजीचा कार्यक्रम आयोजित केला जातो यावर्षी २१ एप्रिल रोजी शंकराचार्य जयंती असल्याने त्या दिवशी सार्वजनिक (उपनयन) मुंजीचा कार्यक्रम सनातन धर्मसभेच्या वतीने आयोजित केला आहे. इच्छुक बटू अथवा त्यांचे पालकांना कार्यक्रमात सहभाग घ्यावयाचा असल्यास संबंधितांनी सायंकाळी ५ .३० ते ७. ३० या वेळेत धर्मसभेच्या कार्यालयास संपर्क साधावा किंवा वे. शां. स. पंडित चकोर गुरूजी (७०८३४५०५७१), वे. शां. स. निलेश धर्माधिकारी गुरूजी (९४२२२२०२३२) व वे. शां. स. उमेश वाळुंजकर गुरूजी (९९२२०७९१५२) यांच्या बरोबर संपर्क साधावा असे आवाहन अध्यक्ष वेदमुर्ती महेश रेखे, उपाध्यक्ष निळकंठ देशमुख, दिनकरराव देशमुख यांनी तसेच कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

## प्रेम क्षेत्रे यांचे अपघाती निधन

नगर – शहरातील बुरूडगाव रोडवरील भोसले आखाडा



येथील प्रेम राजेंद्र क्षेत्रे (वय २९) यांचे १८ एप्रिल रोजी अपघाती निधन झाले आहे. नगर पुणे महामार्गावर केडगाव परिसरात असलेल्या संदीप हॉटेल समोर मोटारसायकल घसरल्याने रस्त्यावर पडून त्यांचे डोके दुभाजकाला आदळले, त्यामुळे गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला.

त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, भावजय, विवाहित बहिण असा परिवार आहे. मर्चंट बँकेतील कर्मचारी राजेंद्र क्षेत्रे यांचे ते चिरंजीव होत.

# विश्वासाने दिलेली वाहने परत न देता दोघांनी केला पोबारा, व्यावसायिकाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

नगर – शहरातील स्टेशन रोड परिसरातील कायनेटिक चौकातून दोघांनी दुचाकी व चारचाकी वाहने विश्वासाने नेऊन ती परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत लखन रमेश पुलावळे (वय २८, रा. दत्त मंदिर परिसर) यांनी फिर्याद दिली आहे. पुलावळे यांचा ट्रॅव्हल्सचा व्यवसाय असून, त्यांच्या ओळखीचा आरोपी ओमकार तुकाराम शेळके (रा. मुखेड, जि. नांदेड) याने फिर्यादीची मोपेड गाडी (क्र. एमएच १६ डीवाय ००९२) विश्वासाने घेऊन गेला. तसेच दुसरा आरोपी साहील सिराज शेख (रा. केडगाव, अहिल्यानगर) याने फिर्यादीचे नातेवाईक हिरामण तांबे यांच्या मालकीची होंडा सिटी कार (क्र. एमएच १२ के टी २४३०) वापरण्यास नेली होती. हे दोघे मार्च महिन्यापासून या गाड्या वापरत होते, मात्र मुदत संपूनही त्यांनी वाहने परत केली नाहीत. फिर्यादीने वारंवार संपर्क साधूनही त्यांनी टाळाटाळ केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पुलावळे यांनी पोलिसांत धाव घेतली.

कोतवाली पोलिसांनी याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६ (२) नुसार गुन्हा नोंदवला असून, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# माउंट लिटेरा झी स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

नगर – दौंड रोड, अरणगाव येथील माउंट लिटेरा झी स्कूलचा सीबीएसई इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के लागला असून शाळेने उत्तम यश संपादन केले आहे. शाळेने दरवर्षीप्रमाणे १०० टक्के निकालाची परंपरा याही वर्षी कायम ठेवली आहे. सर्व विद्यार्थ्यांनी समाधानकारक कामगिरी करत शाळेचा गौरव वाढविला आहे.

या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या प्रा. सौ. शैलजा लोटके यांनी तसेच संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुनील लोटके यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## भामाबाई कापसे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – तालुक्यातील भेर्डापूर येथील भामाबाई भाऊसाहेब कापसे (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. भेर्डापूर सोसायटीचे माजी संचालक बाबासाहेब कापसे व शेतकरी दिलीप कापसे यांच्या त्या मातोश्री होत.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे.

# दिल्लीगेट येथील पान टपरी फोडून रोकडसह सिगारेटच्या पाकिटांची चोरी, गुन्हा दाखल

नगर – शहरातील दिल्ली गेट परिसरात 'द पान कॉर्नर' नावाच्या पान टपरीचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रोकड व सिगारेट ची पाकिटे असा ७ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. ही घटना १८ एप्रिलच्या रात्री ते १९ एप्रिलच्या सकाळच्या दरम्यान घडली आहे.

याप्रकरणी ऋग्वेद गोविंद मंगलारप (वय २१) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दिल्ली गेट चौकातील मधुर मिठाई शेजारी ऋग्वेद यांची पान टपरी आहे. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्याने टपरीच्या मागील दरवाजाचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला. टपरीमधील १,५०० रुपयांची रोख रक्कम, ४ हजार रुपये किमतीचा पितळाचा हंडा आणि १,५०० रुपयांची विविध कंपन्यांच्या सिगारेटची पाकिटे असा एकूण ७ हजार रुपयांचा माल चोरून नेला आहे.

या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४) आणि ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक योगेश चव्हाण या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## तुळशीदास उर्फ अरुण भंडारे यांचे निधन

नगर – विष्णूसदन, हिरवेगल्ली, नालेगाव येथील रहिवाशी



तुळशीदास उर्फ अरुण एकनाथ भंडारे (वय ७०) यांचे १९ एप्रिल रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २० एप्रिल रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे भाऊ, भावजयी, एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# लष्करी शाळेसमोरील इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून पडून मृत्यू

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत जामखेड रस्त्यावरील लष्करी शाळेसमोरील फॅमिली क्वॉर्टर्सच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून खाली पडल्याने एका तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. आशिष गणपती गवळी (वय ३५, रा. माधवबाग, आलमगीर रोड, भिंगार) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास आशिष हा इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून अचानक खाली पडला. या अपघातात त्याच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाली होती. घटनेनंतर तातडीने त्याचे भाऊ नितेश गवळी यांनी त्याला उपचारासाठी शहरातील साईदीप सह्याद्री रुग्णालयात दाखल केले. गेल्या चार दिवसांपासून त्याची मृत्यूशी झुंज सुरू होती. मात्र, १९ एप्रिल रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

याप्रकरणी रुग्णालयातील डॉक्टर भूषण खर्चे यांनी दिलेल्या माहितीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. ही घटना नेमकी कशी घडली, याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.

# राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचारी, शिक्षक २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर

## जुनी पेन्शन, रिक्त पदे, वेतन प्रश्न प्रलंबित; कर्मचारी संघटनांचा निर्णायक लढा, जिल्ह्यात संपाची तयारी पूर्ण

नगर – राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने जिल्हाभरात तसेच शहरातील शासकीय कार्यालयांमध्ये बैठका घेऊन संपाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संपात राज्यभरातील सुमारे १७ लाख कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होणार आहेत. गेल्या दीड वर्षांपासून शासनाकडून कर्मचारी व शिक्षकांच्या विविध मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. यापूर्वीही लक्षवेधी आंदोलने, निवेदने, निदर्शने अशा सातपेक्षा अधिक आंदोलनांद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यावर ठोस निर्णय न झाल्यामुळे कर्मचारी वर्गात नाराजी आणि संताप वाढला आहे.

संघटनांच्या मते, पूर्वीच्या शासनकाळात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाहीत. आर्थिक व सेवाविषयक प्रश्नांवर चालढकल केली जात असल्याने कर्मचारी वर्गामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. सन २०२४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन संदर्भातील अधिसूचना अद्याप लागू न झाल्याने, १ मार्च २०२४ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतनही मिळालेले नाही, ही बाब गंभीर असल्याचे संघटनांनी नमूद केले आहे.

तसेच, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०:२०:३० वर्षांनंतरचे लाभ हजारो कर्मचारी व शिक्षकांना मिळालेले नाहीत. राज्यातील सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे आणि पदोन्नती प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत.

या संपात जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे हे प्रामुख्याने मागण्या आहेत.

संघटनांनी सांगितले की, केरळसारख्या राज्यात ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना उपलब्ध आहे, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही योजना लागू करावी. या बेमुदत संपामुळे शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि विविध विभागांतील कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. नागरिकांना अनेक सेवांमध्ये अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

समन्वय समितीचे राज्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी राज्यातील सर्व कर्मचारी-शिक्षकांना एकत्र येऊन या संपात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. प्रलंबित १८ मागण्यांसाठी हा निर्णायक लढा असून, शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## विठ्ठलराव जिंदम यांचे दुःखद निधन



नगर – रंगारगल्ली, अहिल्यानगर येथील रहिवाशी विठ्ठल यल्लय्या जिंदम (वय ७५) यांचे १९ एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## काशीनाथ पाठक यांचे वृध्दापकाळाने निधन

नगर – सावेडी, मिस्कीनमळा येथील रहिवाशी काशीनाथ



उर्फ बाळासाहेब शंकरराव पाठक (वय ८८) यांचे २० एप्रिल रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे एक मुलगा, तीन मुली, सून, जावई, चार भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या, नातवंडे असा परिवार आहे.

## जमुनाबाई कवडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – खडकी येथील रहिवाशी जमुनाबाई नारायण कवडे



(वय ६६) यांचे २० एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ भाऊ, भावजयी, नातू असा परिवार आहे. भगवान व परसराम कोठूळे यांच्या त्या बहीण होत.

## गुलाबबाई बाफना यांचे हृदयविकाराने निधन

नगर – जामखेड येथील रहिवाशी श्रीमती गुलाबबाई



सुभाषलाल बाफना (वय ७३) यांचे १८ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्याच्या पार्थिवावर जामखेड येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. लखीचंद व दिलीप बाफना यांचे त्या वहिनी तर अभय, अजित, अनिल, अनिता खिंवसरा यांच्या त्या मातोश्री होत.










# सुखी आणि समाधानी, निरोगी जीवन हेच खऱ्या अर्थाने आनंदी जीवनाचा मुलमंत्र

### दत्तात्रय वारकड यांचे प्रतिपादन


अहिल्यानगर येथील जिल्हा कोषागार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना जीवनातील तान तणावापासून मुक्ती व आनंदी जीवन या विषयावर दत्तात्रय वारकड यांनी व्याख्यान दिले.

### आनंदी जीवन या व्याख्यानास जिल्हा कोषागार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा प्रतिसाद

नगर – सध्याच्या स्पर्धात्मक व धावपळीच्या युगामध्ये मानवाचे जीवनमान गतिमान झालेले आहे. निसर्गाच्या अलौकिक निर्मितीतून बहरलेल्या सृष्टीमध्ये मानव हा एकमेव बुद्धिजीवी जीव आहे असं आपण मानतो. परंतु सुख–समृद्धीच्या गराड्यात अडकलेल्या आणि तथाकथित प्रगतीच्या हव्यासाने झपाटलेल्या मानवाला आता मात्र स्वतःचाच विसर पडलेला आहे. भौतिक वस्तूच्या सुख–समृद्धीमध्ये मानव आपली मन: शांती हरवून बसलेला आहे. जगामधील कितीही मौल्यवान व महागड्या भौतिक वस्तूंचा उपभोग घेऊ द्या. परंतु शांत झोप, सुखी आणि समाधानी, निरोगी जीवन हेच खऱ्या अर्थाने आनंदी जीवनाचा मुलमंत्र आहे, असे प्रतिपादन लेखक व प्रेरणादायी वक्ते दत्तात्रय वारकड यांनी केले आहे.

अहिल्यानगर येथील जिल्हा कोषागार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना जीवनातील तान तणावापासून मुक्ती व आनंदी जीवन या विषयावर दत्तात्रय वारकड यांनी व्याख्यान दिले. याप्रसंगी जिल्हा कोषागार कार्यालयाचे अप्पर कोषागार अधिकारी कुशाबा पिसे, रविंद्र काजळकर, संतोष ताठे, राजकुमार पुंड सहाय्यक कोषागार अधिकारी (नेवासा) व ओ.एस सुधीर देशपांडे आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. वारकड म्हणाले, संत ज्ञानेश्वर माऊली, हिंदवी स्वराज्य चे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आदर्शवादी व्यक्तींच्या विचारांचा सांस्कृतिक वारसा जोपासावा व हीच आदर्शवादी शिकवण येणाऱ्या भावी पिढीला द्यावी. व त्यांचे विचार अंगी जोपासावेत, असे आवाहन दत्तात्रय वारकड यांनी उपस्थितांना केले.

जीवनात नकारात्मक विचारांना थारा न देता सकारात्मक, प्रभावी, बलाढ्य आणि बळकट स्वरूपाची विचारसरणी अंगीकारणे काळाची गरज आहे. सोशल मीडिया, मोबाईलचा अतिरिक्त वापर, व धावपळीचे जीवन याचा आपल्या दैनंदिन जीवनावर कळत नकळत विघातक स्वरूपाचा परिणाम होत असतो.अशा परिस्थितीत न डगमगता जीवनात येणाऱ्या आव्हानांना सडेतोड उत्तर देणे आवश्यक आहे. असे जगावे दुनियेमध्ये आव्हानांचे लावून अत्तर नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर या कवी कुसुमाग्रज यांच्या प्रेरणादायी कवितेचा दाखला देत सर्व उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वक्ते दत्तात्रय वारकड यांनी मिळवला. श्रोत्यांनी देखील प्रचंड टाळ्यांनी मनमुराद प्रतिसाद दिला व या प्रेरणादायी व्याख्यानाचा आनंद लुटला.

आनंदी जीवन म्हणजे आयुष्याचा आनंदोत्सव होईल परंतु याकरिता आपण आपल्या जीवनामध्ये जर स्थैर्य हवे असेल तर धैर्य धरावेच लागेल.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली घनवट यांनी केले. मयूर सूर्यपुजारी यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## विवेकानंद आणि वेदान्त

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

वेदांताची दिग्विजयी ध्वजा संपूर्ण विश्वात अखंड फडकावणाऱ्या स्वामी विवेकानंदांनी वेदान्तावर केलेले भाष्य आणि त्यांनी केलेले वेदान्त तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण वैश्विक धर्मसिद्धांताची नवसंहिताच उभी करते. वेदान्तदर्शन हे भारतीय अध्यात्मशास्त्राचे मुकुटमणी मानले जाते. उपनिषदातील सिद्धांतावर आधारलेले हे दर्शन केवळ सैद्धांतिक नाही तर कृतिशील जीवनप्रणालीचा आदर्श आहे. विवेकानंदांचे सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी वेदान्ताची, वैज्ञानिक, व्यावहारिक आणि वस्तुनिष्ठ मूर्त स्वरूपात मांडणी केली. वेदांत हा लोकांच्या आकलनाच्या कक्षेत आला. वेदान्तालाच अद्वैत दर्शन म्हणतात. त्यांनी गिरीकुहरात, तपोधनात किंवा पंडिताच्या पांडित्यपूर्ण सभेत अडकून पडलेल्या वेदान्ताची सुटका केली. संपूर्ण जगाच्या समोर वेदान्ताला मुक्तपणे मांडले. विवेकानंद म्हणायचे, 'अद्वैताचा डंका मी सर्वत्र वाजवीत फिरणार आहे. अद्वैताचे नगारे बाजारहाटातून पर्वतशिखरावरून विस्तीर्ण मैदानातून, मुक्तपणे वाजवीत वेदान्ताचे परमोच्च ज्ञान आणि संदेश देण्याची सिंहगर्जना मी करतो आहे.' हार्वर्ड येथे केलेल्या भाषणात ते म्हणाले होते, 'अमूर्त वेदान्त हा जीवंत व काव्यमय बनला पाहिजे. जीवनाचा रसमय भाग म्हणून तो लोकजीवनात उतरला पाहिजे आणि त्यातून दैनंदिन जीवनात जगण्यातले चैतन्य संचारले पाहिजे.'

वेदान्त हे रूक्ष, घटपटादि तार्किक चर्चा करणारे, लोकांना दुर्बोध वाटणारे, डोक्यावरून जाणारे किंवा जीवनाशी संबंध नसणारे तत्त्वज्ञान न होता ते जीवनाचे प्रेरक, संवर्धक असे जीवनदर्शन व्हायला हवे, असे त्यांना वाटे. वेदान्ताची मुळे विराट सामंजस्याच्या तत्त्वात रूजलेली आहेत. ते सर्वस्पर्शी आणि सर्वसमावेशक अशा एकात्मतेच्या आणि एकतेच्या संकल्पनेवर आधारलेले आहे. जीव आणि परमात्मा दोघेही चैतन्यरूपानेच उभे आहेत. विश्वाची संगती आणि सुसंगती ही त्यावर अवलंबून आहे. म्हणूनच त्यांचे अस्तित्व हे एकरूप, अखंडित, अभंग, अनंत, असीम आणि अविनाशी आहे. माणूस अभेदत्वाने विश्वाशी आणि परमात्म्याशी जोडला असल्याने मानवी जीवनात भेद कशाला? या अद्वैताचा जयघोष करीत स्वामी विवेकानंदांनी 'माणूस' घडविण्याचा धर्म जगाला शिकवला.

**– किशोर गांधी**

# अहिल्यानगर शहरात २८ एप्रिल रोजी निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळावा

### तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाचा उपक्रम, समाजबांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन

नगर – तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने शहरात २८ एप्रिल रोजी निशुल्क बौद्ध वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील युवक–युवतींना योग्य जोडीदार मिळावा आणि विवाह प्रक्रियेला सुलभता यावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय कांबळे व वधू–वर समिती प्रमुख अशोक बागुल यांनी केले आहे.

हा वधू–वर परिचय मेळावा न्यू टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १ वाजता उद्घाटन सत्रानंतर वधू–वर परिचय मेळाव्याला प्रारंभ होणार असून त्यामध्ये सहभागी युवक–युवतींना एकमेकांची ओळख करून देण्यात येणार आहे.

या मेळाव्यात बौद्ध समाजातील अविवाहित युवक–युवतींसह घटस्फोटीत तसेच विधुर व्यक्तींचीही नोंदणी केली जाणार आहे. विवाहासाठी इच्छुक असलेल्या कुटुंबांना एकाच ठिकाणी एकमेकांची माहिती मिळावी आणि संवाद साधता यावा, यासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सहभागी होणाऱ्या युवक–युवतींच्या पालकांनी आपल्या मुला–मुलींचा बायोडाटा व फोटो सोबत घेऊन उपस्थित राहावे, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच मेळाव्याबाबत अधिक माहिती किंवा नोंदणीसाठी संजय कांबळे (मो. ९९७०७७५५२२) व अशोक बागुल (मो. ९८८१८२७८९२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये केडगाव येथील 'ओएसीस इंग्लिश मीडियम स्कूल'ने यशाची परंपरा कायम राखली असून, शाळेच्या विद्यार्थिनींनी यश मिळवले आहे.

# केडगावच्या ओएसीस स्कूलचा 'सीबीएसई'त डंका

नगर – सेंट्रल बोर्ड ऑफ एज्युकेशन (सीबीएसई) द्वारा घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये केडगाव येथील 'ओएसीस इंग्लिश मीडियम स्कूल'ने यशाची परंपरा कायम राखली असून, शाळेच्या विद्यार्थिनींनी यश मिळवले आहे. कु. अन्विता सुहास घिगे हिने ९४ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. आस्था राहुलकुमार शिंगवी (९३.००%) द्वितीय, तर अक्षरा संजय माळवे (९२.००%) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

आजच्या काळात स्पर्धा परीक्षेसाठी पालकांचा ओढा महागड्या खासगी शिकवणीकडे असतो. मात्र, ओएसीस स्कूलच्या या गुणवंतांनी कुठलीही बाहेरील शिकवणी न लावता, केवळ शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि जिद्दीच्या जोरावर हे घवघवीत यश संपादन केले.

निकालाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कु. आस्था शिंगवी हिने इंग्रजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर अक्षरा माळवे हिनेही ९९ गुण मिळवत आपले भाषिक प्रभुत्व सिद्ध केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक भानुदास कोतकर, सचिव सचिन कोतकर, संचालिका वैशालीताई कोतकर, प्राचार्या दारकुंडे मॅडम, पर्यवेक्षक शरद पवार आणि शिक्षक वृंदांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत सुरू असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२६ अंतर्गत 'स्वच्छ सुंदर माझे कार्यालय, जलपुनर्भरण अभियान' हा उपक्रम अहिल्यानगर मध्यम प्रकल्प विभाग कार्यालय व सिंचन भवन परिसरात उत्साहात राबविण्यात आला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्यात 'स्वच्छ सुंदर माझे कार्यालय, जलपुनर्भरण अभियान' उपक्रम साजरा


नगर – शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत सुरू असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२६ अंतर्गत 'स्वच्छ सुंदर माझे कार्यालय, जलपुनर्भरण अभियान' हा उपक्रम अहिल्यानगर मध्यम प्रकल्प विभाग कार्यालय व सिंचन भवन परिसरात उत्साहात राबविण्यात आला. सकाळी १० ते दुपारी १२.३० या वेळेत पार पडलेल्या या मोहिमेची सुरुवात कार्यकारी अभियंता ज. म. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

या पंधरवाड्याचा कालावधी १५ ते ३० एप्रिल असा असून जलसंपदा विभागाच्या नियोजनानुसार विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याअंतर्गत कार्यालय परिसर स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे व जलसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

अभियानादरम्यान जलसंपदा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी प्रतिसाद देत सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यालय परिसरासह अंतर्गत विभाग व वसाहतींमध्ये स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छतेचा संदेश दिला.

कार्यकारी अभियंता यांच्या अखत्यारीतील ताजनापूर मध्यम प्रकल्प बांधकाम उपविभाग क्र. १ व २, शेवगाव तसेच राहुरी व अहिल्यानगर येथील मध्यम प्रकल्प बांधकाम उपविभागांमध्येही स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले.

# द आयकॉन पब्लिक स्कूलचे दहावीच्या निकालात दमदार यश




नगर – द आयकॉन पब्लिक स्कूलने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील दहावीच्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. शाळेने इंग्रजी, हिंदी, गणित, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र या पाच मुख्य विषयांवर लक्ष केंद्रित करत विद्यार्थ्यांची कामगिरी घडवली.

या यशात अथर्व महेश्वरी याने ९६.६ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या पाठोपाठ आर्यन अमित पाल (९५.६ टक्के) आणि आर्या निखिल जामगांवकर (९५.४ टक्के) यांनी उज्वल कामगिरी नोंदवली. एकूण निकाल अत्यंत समाधानकारक ठरला असून ३ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के पेक्षा जास्त, तर तब्बल २४ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून शाळेची गुणवत्ता अधोरेखित केली आहे.

विशेष उल्लेखनीय म्हणजे लिबा सय्यद आणि अदित्री श्रीवास्तव यांनी इंग्रजी विषयात शंभर टक्के गुण मिळवून अभूतपूर्व यश संपादन केले.

संस्थेच्या पॅट्रन सौ. मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, डायरेक्टर ॲडमिनिस्ट्रेशन कर्नल आर. सी. राणा तसेच ट्रस्टी निर्मल मुथा व अमित मुथा यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.


गणेश केदारे मित्र मंडळाच्या अभिनव उपक्रमाद्वारे स्पर्धा परीक्षा केंद्रांतील विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीतून 'ज्ञानाचा जागर', अहिल्यानगरमध्ये स्पर्धा परीक्षार्थींसाठी सराव परीक्षा

नगर – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अहिल्यानगरमध्ये केवळ जल्लोष न करता, त्यांच्या शिक्षण या मूलभूत विचाराचा प्रसार करण्यासाठी एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला. गणेश केदारे आणि त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने यूपीएससी आणि एमपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १४ एप्रिल रोजी न्यू आर्टस् कॉलेज मैदानावर सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले. गेल्या ५ ते ६ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवला जात असून, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयीची आवड निर्माण करण्याचा यामागचा प्रमुख उद्देश आहे. बाबासाहेबांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हटले आहे. जयंतीच्या निमित्ताने हाच विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यांना स्पर्धा परीक्षेची गोडी लागावी, यासाठी आम्ही सराव परीक्षा घेतो, असे केदारे मित्र परिवाराच्या वतीने सांगण्यात आले.

या परीक्षेला शहरातील विविध स्पर्धा परीक्षा केंद्रांतील विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. कार्यक्रमास लक्ष अकॅडमीचे मंगेश कवडे, जगदंब अकॅडमीचे मालोजी शिकारे, बी ॲण्ड डब्ल्यू अकॅडमीचे हर्षद वारे, पिंपळे अकॅडमीचे पिंपळे सर, राजमुद्रा अकॅडमीच्या पांडुळे मॅडम तसेच शिवरक्षक महाडिक मेजर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी आयोजनासाठी ओंकार लेंडकर, सनी साळवे, संकेत लोखंडे, आकाश वैरागर आणि गणेश केदारे यांनी परिश्रम घेतले. परीक्षेदरम्यान विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षकांची उपस्थिती लाभली.

# समता परिषदेच्या वतीने छगनराव भुजबळ यांचे नगरमध्ये स्वागत


मंत्री छगन भुजबळ यांच्या अहिल्यानगर शहरातील आगमनावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष भरत गारुडकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्रसंगी राज्य उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, माजी महापौर भगवानराव फुलसौंदर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार आदी उपस्थित होते.


### भरत गारुडकर यांना राज्य पातळीवरील जबाबदारीचे संकेत

नगर – अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या अहिल्यानगर शहरातील आगमनावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष भरत गारुडकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्रसंगी राज्य उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, माजी महापौर भगवानराव फुलसौंदर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, महानगर अध्यक्ष ब्रिजेश ताठे, कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे, प्रकाश इवळे, डॉ. नागेश गवळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी भरत गारुडकर यांनी समता परिषदेच्या विविध उपक्रमांबाबत छगनराव भुजबळ यांच्याशी चर्चा केली.

या भेटीत बोलताना छगन भुजबळ यांनी समता परिषद ही समाजातील वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी लढणारी एक प्रभावी संघटना असल्याचे नमूद केले. त्यांनी सांगितले की, महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळात अधिक गरज आहे. शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय या त्रिसूत्रीवर समाज उभा राहू शकतो. समता परिषदेच्या माध्यमातून हे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. कार्यकर्त्यांनी संघटित राहून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे. शासनही अशा सकारात्मक कार्यांना नेहमीच पाठिंबा देईल. त्यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण व शहरी भागातील तफावत कमी करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे आणि समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणणे हीच खरी प्रगती आहे.

भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाज परिवर्तनासाठी असले पाहिजे. समता परिषदेचे कार्य हे समाजातील विषमता दूर करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. भरत गारुडकर यांच्यासारखे कार्यकर्ते सातत्याने लोकांसाठी झटत आहेत, हे प्रेरणादायी आहे. त्यांच्या कामाची दखल राज्य पातळीवर घेतली जात आहे आणि भविष्यात त्यांना मोठी जबाबदारी दिली जाईल, असे संकेत त्यांनी दिले.

यावेळी भरत गारुडकर यांनी सांगितले की, समता परिषद ही केवळ संघटना नसून एक सामाजिक चळवळ आहे. आम्ही नेहमीच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढा दिला आहे. विविध आंदोलनांद्वारे आम्ही शासनाचे लक्ष वेधले असून अनेक प्रश्न मार्गी लावण्यात यश मिळवले आहे. पुढील काळातही समाजहिताच्या प्रश्नांवर आम्ही अधिक ताकदीने काम करू. छगन भुजबळ यांच्यासारख्या अनुभवी नेतृत्वाचे मार्गदर्शन मिळत असल्याने आमच्या कार्याला नवी दिशा मिळत आहे. त्यांनी पुढे सांगितले की, समता परिषदेच्या माध्यमातून युवकांना संघटित करून सामाजिक बदल घडवून आणण्याचा संकल्प त्यांनी केला आहे.




श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात इंद्रेश उपाध्याय. शेजारील छायाचित्रात भाविकांची झालेली गर्दी. (छाया : राजेंद्र बुलबुले)

# करिअरची पळापळ सुखासाठी मात्र परमशांती श्रीकृष्ण नामातच

## इंद्रेश उपाध्याय यांचे प्रतिपादन

नगर – अलिकडे करिअरच्या नावाखाली सर्व पळापळ सुखासाठी चालली असली तरी परमशांती भगवान श्रीकृष्णांच्या नामातच मिळते, असा विश्वास वृंदावन निवासी इंद्रेश उपाध्याय यांनी व्यक्त केला.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकर गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. सुधीर झालानी, किसनलाल बंग व प्रदिप पंजाबी यांच्यासह शहरातील भाविक श्रोत्यांना श्रवणाचा उत्तम आनंद मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत.

इंद्रेश उपाध्याय पुढे म्हणाले, आपल्याला सुख कशाने मिळेल? याचा विचार करून निर्णय घेतले जातात. पण सुख परमशांतीचा आनंद मिळवून देऊ शकत नाही. त्याकरिता निसर्गरम्य डोंगर परिसरात, नदीच्या किनाऱ्यावर, समुद्राच्या किनाऱ्यावर गेल्यावर मन शांत होते. शांतीत सुख नव्हे तर आनंद असतो. भगवान श्रीकृष्णांच्या लिलांचे स्मरण करत नाम घेत राहिले की, शांतीचा परमानंद मिळतो.

कथा श्रवणाने आपले रूप, स्वरूप, व्यवहार बदलतो. भाव जागृती होते. जीवनातील संकट, विपत्ती, कष्ट, शारिरीक व्यथा, परिवारातील व्दिधावस्था केवळ श्रीकृष्णांच्या स्मरणाने निघून जाते. एकांतात बसून श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी हे नाथ नारायण वासुदेवा...हे भजन म्हणण्यास सुरुवात केली की, सर्व संकटे दूर चालल्याचे जाणवते. कृष्णलिलांचे चिंतन डोळे बंद करून करावे, श्रीकृष्ण सोबत असल्याचे अनुभवता येते.

वयाच्या ७ वर्षात करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलण्याची लिला श्रीकृष्णाने करून दाखवताना त्याचे श्रेय मात्र ब्रजवासींना दिले. इतरांना मान–सन्मान–श्रेय देणे हा श्रीकृष्णांचा स्वभावच आहे. आपण दुसऱ्यांचा मान, श्रेय हिसकावून घेतो. कृष्ण भक्त बनण्याची इच्छा असल्यास आपला मान–श्रेय इतरांना देणे शिकले पाहिजे.

आज भारताला निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, तुकाराम, सुरदास, नामदेव यांची गरज आहे. शुध्द आचरण असलेल्या माता–पित्याच्या पोटी भक्त जन्म घेतात. भक्तीचा प्रवाह खळाळता ठेवण्याचे मौलिक कार्य भक्त करतात. गोवर्धन पूजा, रास लिला यांचे वैशिष्ट्य समजावून घेताना उपस्थित सर्वच श्रीकृष्णमय झालेले दिसत होते.

# सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना आजीवन फ्री पास

## दीर्घ लढ्याला अखेर यश, अहिल्यानगरमध्ये पार पडला विजयी मेळावा

नगर – सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना आजीवन मोफत प्रवासाचा पास मिळावा, या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला अखेर यश मिळाले असून, एसटी महामंडळाने ही मागणी मान्य केली आहे. सेवानिवृत्त एसटी कर्मचारी संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर विभागाच्या वतीने जेऊर बायजाबाई (ता. नगर) येथे विजयी मेळावा पार पडला. संघटनेचे केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे यांच्या अध्यक्षतेखाली हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यात कार्याध्यक्ष अर्जुनराव बकरे, राज्यस्तरीय पदाधिकारी व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बलभीम कुबडे यांचा अभिनंदन ठराव मांडण्यात आला. या ठरावाला गोरख बेळगे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सदस्यांनी राज्यस्तरीय पदाधिकारी व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य यांचे अभिनंदन ठराव टाळ्यांच्या कडकडाटात एकमताने मंजूर केला.

यावेळी बोलताना बलभीम कुबडे यांनी सांगितले की, संघटनेच्या एकजुटीच्या बळावर आणि सभासदांच्या ताकदीवर हा लढा यशस्वी झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी अखेर पूर्ण झाली असून, यामुळे राज्यातील सुमारे ४६ हजार सेवानिवृत्त एसटी कर्मचारी, त्यांचे पती–पत्नी तसेच विधवा महिलांना वर्षभर मोफत एसटी प्रवासाचा लाभ मिळणार आहे. पूर्वी १९९६ पासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दोन महिने, सहा महिने किंवा नऊ महिन्यांच्या कालावधीसाठीच मोफत पास दिला जात होता. मात्र, हा पास कायमस्वरूपी (१२ महिने) मिळावा, अशी मागणी अनेक वर्षांपासून सातत्याने केली जात होती. अखेर शासन आणि परिवहन मंडळाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

या प्रसंगी ज्ञानदेव अकोलकर, शिवाजी कडूस, अरुण दळवी यांनी संघटनेच्या कामकाजावर विश्वास व्यक्त करत कामगारांच्या प्रश्नांसाठी आवश्यक तेव्हा आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचे आश्वासन दिले.

मेळाव्यात संघटनेचे जिल्हाध्यक्ष गंगाधर कोतकर यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मगर, माजी विभागीय वाहतूक अधिकारी बाळासाहेब चव्हाण, भाऊसाहेब तोडमल तसेच जेऊर येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विठ्ठल देवकर यांनी आभार मानले.



अहिल्यानगरमध्ये एसटी कर्मचाऱ्यांचा विजयी मेळावा पार पडला.

# शिक्षणासोबत संस्कार देणे महत्त्वाचे : मधुसुदन सारडा



हिंद सेवा मंडळाच्या बागडपट्टी विभागातील प्राथमिक शाळेत मातृ–पितृ पूजन दिन साजरा करण्यात आला.

## हिंदसेवा च्या प्राथमिक शाळेत मातृ पितृ पूजन दिन साजरा

नगर – मातृ पितृ देवो भवही आपली भारतीय संस्कृती आहे. आई–वडील आणि गुरुजन यांचा आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच संस्कार देणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या बागडपट्टी विभागातील प्राथमिक शाळेत मातृ–पितृ पूजन दिन साजरा करण्यात आला. चला तर मग ....पाहूया शाळेचे अंतरंग ! म्हणून उपक्रम घेण्यात आला. यावेळी मुलांनी काढलेल्या चित्राचे प्रदर्शन, विविध उपक्रमाचे ४०० फोटो काढून एका कक्षात मांडणी करण्यात आली. तसेच स्पर्धा परीक्षांत २५ वर्ष सातत्याने यश मिळविले त्यांचे वर्तमान पत्रातील बातम्या शाळेच्या दर्शनी भागात लावण्यात आले.

याप्रसंगी पेमराज सारडा महाविद्यालयाचे जुनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा, सिताराम सारडा विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक डोळसे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे उपस्थित होते.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, मातृ–पितृ पूजन करणे ही आपली संस्कृती आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच संस्कार मिळत आहेत. ही कौतुकास्पद बाब आहे. असे उपक्रम सातत्याने राबविण्यात यावे.

अशोक डोळसे म्हणाले, प्राथमिक शाळेने मातृ पितृ पूजन व गुरु पूजन करून विद्यार्थ्यांना चांगले संस्कार केले आहेत. विद्यार्थ्यांनी नेहमी आई–वडील आणि शिक्षकांचा आदर बाळगावा.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे म्हणाले, शाळेत नेहमीच पालक येतात पण सर्वच पालकांना शाळेतील सर्व उपक्रमांची माहिती नसते. म्हणून आज शाळेतील इयत्ता चौथी मधील मुलांनी ५० प्रयोग मांडले सर्व मुलांनी माहिती प्रयोगशाळेत दिली. वाचनालयात मुले पुस्तके वाचत आहेत. तर अ‍ॅक्टीव्हीटी हॉल मध्ये मुले नृत्य करत आहेत. असे सुंदर दृष्य दिसत होते. स्वतंत्र स्पर्धा परीक्षा केंद्रात मुले अभ्यास करत आहेत.या सर्व दालनांना ३०० पालकांनी आज भेटी दिल्या. शिक्षकांनी मार्गदर्शक करत प्रत्येक दालनाची माहिती दिली.

या कार्यक्रमासाठी शाळेतील विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.मनिषा साळी, सौ.सासवडकर अंजली, पठाण मुदस्सिर, सौ.धाडगे अरुणा, सौ.पोतदार विदया, अभिजित जवादे, श्रीमती जंगम मनिषा, सौ.चावरे कल्पना, सौ.सोनाली मच्चा, सौ.सपना धोत्रे, सौ. अर्चना वाकचौरे, सौ.अर्चना परभणे, कु.माधुरी धायतडक, संदिप कळसकर, सौ.नंदा देवतरसे, सौ.दिपाली कोल्हे आदींनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थी, शिक्षक यांच्या परिश्रमामुळे संस्थेचा नावलौकिक वाढला

## रामकिसन देशमुख यांचे प्रतिपादन

नगर – आमचे आधारस्तंभ स्व.डॉ.नाथ पाऊलबुधे यांनी ज्या उद्देशाने संस्थेची उभारणी केली, शैक्षणिक कार्य करताना सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे या हेतूने शाळा सुरू केली, त्यांचा उद्देश सफल झाला. आमच्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांनी परिश्रम घेऊन शैक्षणिक क्षेत्रात चांगले विद्यार्थी घडविले, अशा शिक्षकांना पीएचडी पदवी प्राप्त झाली. विद्यार्थी व शिक्षक यांच्या परिश्रमामुळे सेवा शिक्षण प्रसारक संस्था नावारूपास आली. ही कौतुकास्पद बाब आहे, असे प्रतिपादन सचिव रामकिसन देशमुख यांनी केले.



डॉ.एन.जे.पाऊलबुधे फार्मसीच्या प्रा.अनुराधा चव्हाण यांना पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रामकिसन देशमुख दादासाहेब भोईटे, प्राचार्य विभाग प्रमुख, शिक्षकवृंद आदी (छाया – विजय मते)

## प्रा.अनुराधा चव्हाण यांना मिळालेल्या पीएच.डी.पदवी बद्दल सन्मान

अहिल्यानगर येथील वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन.जे.पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी येथील डी.फार्म अभ्यासक्रमाच्या प्राचार्या प्रा. अनुराधा चव्हाण यांना औषध निर्माणशास्त्र या विषयात पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली आहे. निमित्त त्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, बी फार्म विभागाचे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, प्राचार्य सुचित्रा डावरे, विजया नवले, सविता सानप, अनिता सिद्धम, डॉ.वेणू कोला, डॉ. प्रसाद घुगरकर, डॉ.रोशनी सूर्यवंशी, डॉ.विजय तारडे, सौ. स्वाती कडनोर आदी उपस्थित होते.

प्रा.अनुराधा चव्हाण यांनी कंपॅरेटिव्ह स्टॅण्डर्डाइझेशन अ‍ॅण्ड फार्माकोकायनेटिक स्टडी ऑफ कॅम्प्रेहेन्व्हेंशनल हर्बल एक्सट्रॅक्ट अ‍ॅण्ड देयर नॉवेल फॉर्म्युलेशन या विषयावर सखोल संशोधन पूर्ण केले आहे.

ही पदवी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न संशोधन केंद्र, शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर येथून संपादन केली. त्यांच्या संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ.अनिलकुमार उत्तमचंद ताटिया यांनी मार्गदर्शन केले.

# आनंदधाम येथे १ ते ६ मे दरम्यान आनंद बाल संस्कार शिबिराचे आयोजन



नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे शिष्य प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी महाराज यांनी कायम नवीन पिढीला संस्कारीत करण्याचा, त्यांच्यात नीतिमूल्ये रूजवण्याचा आग्रह धरला. याच शिकवणुकीनुसार शिक्षा आणि संस्कार देऊन मुलांच्या जीवनाला सुंदर आकार देण्याचा उद्देश समोर ठेवून आनंदधाम येथे आनंद संस्कार शिक्षा अभियान अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. याअंतर्गत याही वर्षी उन्हाळी आनंद बाल संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. १ ते ६ मे या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ११ यावेळेत हे शिबिर होणार आहे. इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे जैन मुले मुली यात सहभागी होऊ शकतील,शिबिरात मुलांना शारीरिक व्यायाम, प्रार्थना, जैन तत्त्वज्ञानाची शिकवण तसेच ब्रेन ॲक्टिव्हिटी यांचा समावेश आहे. मुले मुलींना सकाळच्या नाश्त्याची न्याहारीची सोय केलेली असते. त्यायोगे मुले सहभोजनातून अनेक चांगल्या शिकवणी आत्मसात करत असतात.

आताच्या काळात मुलांवर सोशल मीडियाचा, इंटरनेटचा प्रभाव वाढला असला तरी सुटीच्या काळात त्यांना सोशल मिडिया पासून दूर ठेवत मोकळ्या वातावरणात शिक्षा आणि संस्कार मिळण्यासाठी हे शिबिर महत्त्वाचे आहे. मुलांमध्ये संघटन कौशल्य, नेतृत्व गुण, संवाद कौशल्य, धार्मिक संस्कार, नीतिमूल्ये, परस्पर संवाद, नियमित व्यायामाचे महत्त्व रूजण्यास शिबिरामुळे मदत होईल. जैन पालकांनी पाल्यांना शिबिरात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन आनंद संस्कार शिक्षा अभियानाच्या प्रमुख सौ. सरोज कटारिया यांनी केले आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क : ७५८८६९६०७८, ८२०८३०१९२८, ९८९००२५८११.

# 'सिद्धी पॅरामेडिकल' मधील विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी




नगर – सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट मधील हेल्थ अ‍ॅण्ड सॅनिटेशन ऑफिसर अभ्यासक्रमाच्या मार्च २०२६ परीक्षेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून, या परीक्षेत नूरमोहम्मद पटेल यांनी ८०.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच गोविंद पालवे यांनी ८०.००% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला असून, योगेश बडे यांनी ७८.००% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे.

विद्यार्थ्यांच्या या कामगिरीबद्दल संस्थेच्या संचालिका सिद्धी लुंकड व शिक्षकवृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनत, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाले असल्याचे मत डॉ. तृप्ती रांका यांनी व्यक्त केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# दिव्यांग मुलाच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट



नगर – भुईकोट किल्ला परिसरातील पंडित नेहरू हिंदी विद्यालयात एक वेगळाच, हृदयाला स्पर्श करणारा प्रसंग अनुभवायला मिळाला. शिक्षक वडिलांनी आपल्या दिव्यांग मुलाच्या वाढदिवसाला केवळ घरापुरता आनंद न ठेवता, तो समाजासोबत वाटण्याचा निर्णय घेतला आणि त्या भावनेतून अनेक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविले.

शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे यांनी आपल्या दिव्यांग मुलगा नचिकेत बोडखे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले. नचिकेतला इतर मुलांप्रमाणे शाळेत जाता येत नाही, ही जाणीव मनाला टोचत असतानाही बोडखे यांनी त्या वेदनेला सकारात्मक रूप देऊन गरजू विद्यार्थ्यांमध्ये आपल्या मुलाचे शिक्षण पाहिले. दरवर्षी ते आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदतीचा उपक्रम राबवत असतात.

कार्यक्रमात नचिकेतच्या हस्तेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. त्या क्षणी उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यांत भावना दाटून आल्या, कारण त्या वाटपामागे केवळ वस्तू नव्हत्या, तर एका वडिलांचे प्रेम, वेदना आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी होती. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक सुहास धिवर, बाबासाहेब बोडखे, गोपीचंद परदेशी, कमल भोसले, कविता जोशी, वैभव शिंदे, सुदेश छजलाने, शिल्पा घायतडक, मोनिका मेहतानी, परीक्षित सुने, नूतन गाडे, पिंकी कुलटकर, मोनिका साळुंके, ठाकुरदास परदेशी, योगेश गायकवाड यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

याच वेळी आणखी एक भावनिक आणि प्रेरणादायी क्षण अनुभवायला मिळाला. दोन वर्षांपूर्वी नचिकेतच्या वाढदिवसानिमित्त लावलेल्या झाडांचे संगोपन करून त्यांचा दुसरा वाढदिवस साजरा करण्यात आला. झाडांना फुलांच्या माळा घालून आरती करण्यात आली. जणू काही त्या झाडांमध्येही नचिकेतच्या आयुष्याचा आनंद साजरा होत होता.

मुख्याध्यापक सुहास धिवर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, बोडखे सरांनी आपल्या वैयक्तिक वेदनेला समाजोपयोगी कार्यात बदलले आहे. ही केवळ मदत नाही, तर समाजाला दिशा देणारा संदेश आहे. अशा शिक्षकांमुळेच समाजात माणुसकी जिवंत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

बाबासाहेब बोडखे म्हणाले की, माझा मुलगा नचिकेत त्याला इतर मुलांसारखे शाळेत जाता येत नाही, हे माझ्यासाठी आयुष्यातील सर्वात मोठे दुःख आहे. प्रत्येकवेळी शाळेत जाताना, मुलांना पाहताना मला त्याची आठवण येते मन भरून येते. पण मी ठरवलंही वेदना मला खचवणार नाही, तर समाजासाठी काहीतरी चांगलं करण्याची ताकद देणार. म्हणूनच मी नचिकेतचा वाढदिवस साजरा करताना इतर मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्यासाठी ही सर्व मुलं म्हणजेच माझा नचिकेत आहेत. त्यांच्या डोळ्यातील चमक, त्यांच्या चेहऱ्यावरचं हसूहेच माझ्यासाठी खऱ्या अर्थाने वाढदिवसाचं गिफ्ट आहे. आपण आपल्या मुलांसाठी जगतो, पण समाजासाठीही काहीतरी देणं हे आपलं कर्तव्य आहे. प्रत्येकाने जर आपल्या आनंदाचा एक छोटासा भाग इतरांसोबत वाटला, तर अनेकांच्या आयुष्यात प्रकाश पडू शकणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अर्थजगत

# ‘एनपीएस स्वास्थ्य’ मधील महत्त्वाचे बदल आणि तरतुदी

पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण (पीएफआरडीए) यांनी ‘एनपीएस स्वास्थ्य’ या विशेष उपक्रमाच्या दुसऱ्या प्रायोगिक टप्प्याला मंजुरी दिली आहे. या नवीन नियमावलीनुसार, आता या योजनेत सहभागी होणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी आरोग्य विमा घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही योजना स्वेच्छेने स्वीकारता येणारी पेन्शन योजना असून, भारतातील कोणताही नागरिक यात सहभागी होऊ शकतो. या योजनेचा मुख्य उद्देश गुंतवणूकदारांना रुग्णालयातील भरती आणि बाह्यरुग्ण विभागातील (ओपीडी) उपचारांच्या खर्चासाठी आर्थिक संरक्षण प्रदान करणे हा आहे.

**■ विम्याची व्याप्ती आणि प्रीमियमची प्रक्रिया**


या योजनेअंतर्गत प्रत्येक गुंतवणूकदाराला आरोग्य विमा कवच मिळणे बंधनकारक आहे. विम्याच्या अटी संबंधित विमा कंपनी आणि भारतीय विमा नियामक व विकास प्राधिकरण (आयआरडीएआय) यांच्या नियमांनुसार निश्चित केल्या जातील. विम्याचा हप्ता (प्रीमियम) थेट गुंतवणूकदाराच्या एनपीएस खात्यातून ‘अंशतः पैसे काढणे’ (पार्शिअल विड्रॉल) या स्वरूपात वळता केला जाईल. यामुळे गुंतवणूकदाराला स्वतंत्रपणे विमा खरेदी करण्याची गरज उरणार नाही आणि निवृत्ती वेतनाच्या खात्यासोबतच आरोग्य सुरक्षाही प्राप्त होईल.

**■ गुंतवणुकीचे निकष**

सुरुवातीची गुंतवणूक: या योजनेत प्रवेश करण्यासाठी किमान २५,००० रुपये इतकी सुरुवातीची गुंतवणूक करणे आवश्यक आहे. या गुंतवणुकीनंतरच सदस्य योजनेच्या फायद्यांसाठी पात्र ठरू शकतील.

खात्यातील किमान शिल्लक: वैद्यकीय गरजांसाठी निधी काढण्यासाठी खात्यात किमान ५०,००० रुपये असणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे, यासाठी कोणताही ‘वेटिंग पिरियड’ म्हणजेच प्रतीक्षा कालावधी ठेवण्यात आलेला नाही.

निधी काढण्याची मर्यादा: एनपीएस सदस्य आपल्या एकूण निधीपैकी २५ टक्के हिस्सा वैद्यकीय कारणांसाठी कधीही काढू शकतात.




**■ माहीत आहे?**

**■ आपत्कालीन परिस्थितीत १०० टक्के निधीची सुविधा**

या सुधारित योजनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गंभीर आजार किंवा रुग्णालयात भरती होण्याची वेळ आल्यास गुंतवणूकदाराला आपल्या एनपीएस निधीतील पूर्ण १०० टक्के रक्कम काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. यापूर्वी केवळ अंशतः रक्कम काढण्याची सुविधा उपलब्ध होती, परंतु आता उपचाराचा खर्च अधिक असल्यास संपूर्ण निधी एकाच वेळी वापरता येईल.

ही रक्कम थेट संबंधित रुग्णालय, विमा कंपनी किंवा संस्थेला पाठवली जाईल, जेणेकरून उपचारात कोणताही विलंब होणार नाही. उपचारांनंतर काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती पुन्हा गुंतवणूकदाराच्या खात्यात जमा केली जाईल.

## परतावा आणि व्यवस्थापन

या योजनेत जमा केलेला पैसा पेन्शन फंड मॅनेजरमार्फतच गुंतवला जाईल, ज्यावर बाजारानुसार परतावा मिळत राहील. जोपर्यंत गुंतवणूकदार आरोग्य कारणांसाठी निधी काढत नाही, तोपर्यंत ही रक्कम निवृत्तीनंतरच्या बचतीसाठी वाढत राहील. नियामक मंडळाने स्पष्ट केले आहे की, या योजनेतील सर्व अटी आणि विम्याशी संबंधित माहिती पूर्णपणे पारदर्शक ठेवली जाईल, जेणेकरून ग्राहकांना सर्व तांत्रिक बाबींची स्पष्ट कल्पना असेल.

◆◆◆




# ‘पॉकेट मनी’ फीचर वापरावे का?

**मागील काही दिवसापासून ‘गुगल पे’ला लॉग इन झालात की तिथं एक नवीन आयकॉन बटन ‘पॉकिट मनी’ हे दिसत आहे. ! पण ‘याला टच करू नका. तुमच्या खात्यातील पैसे जातील. अनेकांचे गेले आहेत,’ असं सांगणारे मेसेज व्हायरल झाल्याने गोंधळात भर पडली आहे. वास्तविक हे फिचर प्रामुख्याने लहान मुले किंवा घरातील अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठी डिझाईन केलेले आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, हे पालकांसाठी डिजिटल पद्धतीने ‘पॉकिट मनी’ देण्याचे एक साधन आहे.**

‘पॉकेटमनी फिचरची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. यात पालकांचे नियंत्रण असून पालक त्यांच्या मुलांच्या गूगल पे खात्यावर ठराविक रक्कम मर्यादित स्वरूपात सेट करू शकतात.

पालकांसाठी हे सोयीचे आहे. कारण मुलांना प्रत्यक्ष रोख रक्कम (कॅश) देण्याऐवजी डिजिटल पद्धतीने पैसे देता येतात, ज्यामुळे खर्चावर लक्ष ठेवणे सोपे जाते. सुरक्षित व्यवहाराच्या दृष्टीने मुले पालकांनी सेट केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च करू शकत नाहीत आणि प्रत्येक व्यवहारानंतर पालकांना त्याचे नोटिफिकेशन मिळते. डिजिटल साक्षरतेसाठी लहान मुलांना जबाबदारीने पैसे कसे खर्च करावेत, हे शिकवण्यासाठी याचा वापर होतो.

हे फीचर तुमच्या फोनवर का दिसत आहे? जर तुमच्या घरातील एखाद्या लहान मुलाचे खाते तुमच्या गुगल फॅमिली ग्रुपशी जोडलेले असेल, तर तुम्हाला हा सिम्बॉल दिसू शकतो. गुगल पे सध्या काही विशिष्ट वापरकर्त्यांसाठी अशा नवीन फीचर्सचे अपडेटस् रोल-आउट करत आहे.

याचा वापर करायचा नसेल, तर गुगल पे च्या ‘सेटिंग्स’ मध्ये जाऊन तुमच्या फॅमिली किंवा पेमेंट प्रोफाईलमध्ये बदल करू शकता. या फीचरमध्ये दोन भूमिका असतात. पहिली म्हणजे प्रायमरी युजर (पालक) ज्यांच्या बँक खात्यातून पैसे जातात आणि पूर्ण कंट्रोल त्यांच्या हातात असतो.

दुसरी भूमिका म्हणजे सेकंडरी युजर (मुल / दुसरी व्यक्ती) जी स्वतःच्या फोनवरून पेमेंट करू शकते पण पैसे पालकांच्या खात्यातून जातात. तुम्ही मंथली लिमिट सेट करू शकता, ज्यात पालक १५,००० रुपयांपर्यंत मासिक खर्च मर्यादा सेट करू शकतात.

यात दोन प्रकारचे कंट्रोल आहेत. फुल डेलिगेशनमध्ये मुलाला ठराविक लिमिटमध्ये स्वतः पेमेंट करता येतं आणि अप्रूव्हल मोडमध्ये प्रत्येक पेमेंट आधी पालकांची मंजुरी लागते. लाईव्ह ट्रॅकिंगमुळे पालकांना प्रत्येक ट्रान्झॅक्शनची ताबडतोब नोटिफिकेशन मिळते आणि खर्च ट्रॅक करता येतो. सेफ्टी कंट्रोल अंतर्गत कधीही ॲक्सेस पॉज किंवा रिमूव्ह करू शकतात.

**फायदे काय आहेत?**

विशेष म्हणजे मुलांना स्वतंत्र बँक अकाउंटची गरज नाही. याचा फायदा म्हणजे मुलांना डिजिटल पेमेंट

**■ अर्थसाक्षरता**

शिकायला मदत होते, पालकांना पूर्ण नियंत्रण आणि सुरक्षितता मिळते, खर्चावर नियंत्रण म्हणजेच बजेट डिसिप्लिन राहते आणि फायनान्शिअल लिटरसी वाढते.

समजा तुम्ही तुमच्या मुलाला ३००० रुपये पर मंथ लिमिट दिली, तर तो दुकानात क्यू आर स्कॅन करून पेमेंट करू शकतो पण ३००० रुपयांपेक्षा जास्त खर्च करू शकत नाही आणि तुम्हाला प्रत्येक खर्चाची माहिती येते.

सध्या तरी त्या फीचरकडे ‘आर अँड डी’ स्वरूपात पाहून व तटस्थ राहून काही काळ जाऊ द्यावा, इतर मंडळी जे ते फिचर वापरत असतील, त्यांचा अनुभव नंतर समजून घ्यावा आणि तो तुम्हाला सुटेबल असेल तर ते फिचर वापरायला हरकत नाही.

**- डॉ. धनंजय देशपांडे**
सायबर सुरक्षातज्ज्ञ

◆◆◆

# आयटीआर-१ फॉर्ममध्ये महत्त्वाचे बदल

आयकर विभागाने आकलन वर्ष २०२६-२७ साठी सर्व आयकर विवरणपत्र (आयटीआर) फॉर्म जाहीर केले आहेत. यंदा करदात्यांना मोठा दिलासा देत विभागाने प्रामुख्याने आयटीआर-१ फॉर्ममध्ये महत्त्वाचे बदल केले आहेत. आता दोन घरांपासून मिळणारे भाड्याचे उत्पन्नही आयटीआर-१ मध्ये दर्शवता येणार आहे. यापूर्वी दोन घरे असल्यास आणि दोन्हीकडून भाडे येत असल्यास करदात्यांना आयटीआर-२ फॉर्म भरावा लागत असे. ही नवीन सवलत विशेषतः सेवानिवृत्तीनंतर दुसऱ्या घरातून भाडे मिळवणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.




मात्र, यासाठी करदात्याची एकूण वार्षिक कमाई ५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावी, ही अट कायम आहे.

दोन घरांपासून मिळणारे भाडे उत्पन्न दर्शवताना करदात्यांनी अधिक सावध राहणे आवश्यक आहे. भाड्याची रक्कम, महानगरपालिकेला दिलेला कर आणि कपात केलेल्या कराचा सर्व तपशील हा ‘वार्षिक कर

**■ टॅक्स झोन**

माहिती’ (एआयएस) मधील माहितीशी तंतोतंत जुळणे गरजेचे आहे. जर एआयएस मधील माहिती आणि आयटीआर मधील माहिती यात तफावत आढळली, तर आयकर विभागाची ‘एआय’ प्रणाली तातडीने नोटीस पाठवू शकते. त्यामुळे माहिती भरताना अत्यंत पारदर्शकता राखणे अनिवार्य आहे.

**म्युच्युअल फंड आणि शेअर्सवरील नफ्यासाठी नवीन मर्यादा**

यंदापासून करदात्यांना सूचीबद्ध शेअर्स आणि म्युच्युअल फंडांतून मिळणारा दीर्घकालीन भांडवली नफा (एलटीसीजी) देखील आयटीआर-१ मध्ये दाखवता येईल. मात्र, यासाठी या नफ्याची मर्यादा १.२५ लाख रुपयांपर्यंतच निश्चित करण्यात आली आहे. जर हा नफा १.२५ लाख रुपयांपेक्षा एक रुपयाही जास्त झाला, तर करदात्याला बंधनकारकपणे आयटीआर-२ फॉर्म भरावा लागेल. चुकीचा फॉर्म भरल्यास कर विवरणपत्र अमान्य ठरवले जाऊ शकते. तसेच, बजेट २०२४-२५ मधील घोषणेनुसार आता सर्व गुंतवणूक मालमत्तांवरील एलटीसीजीचा दर १२.५ टक्के निश्चित करण्यात आला आहे.

आयटीआर-२ फॉर्म कधी भरणे आवश्यक आहे?

काही विशिष्ट परिस्थितीत करदात्यांना आयटीआर-२ चाच वापर करावा लागेल. जर वार्षिक एकूण उत्पन्न ५० लाख रुपयांपेक्षा जास्त असेल, शेअर बाजारातील दीर्घकालीन नफा १.२५ लाखांच्या वर असेल किंवा अल्पकालीन भांडवली नफा (एसटीसीजी) झाला असेल, तर आयटीआर-२ भरावा लागेल. याव्यतिरिक्त, जर करदाता एखाद्या कंपनीत संचालक असेल, त्याच्याकडे परदेशात मालमत्ता किंवा बँक खाते असेल किंवा अनलिस्टेड शेअर्स असतील, तर आयटीआर-२ भरणे बंधनकारक आहे. तसेच कृषी उत्पन्न ५,००० रुपयांपेक्षा जास्त असल्यासही याच फॉर्मचा वापर करावा लागेल.

**कर मर्यादा आणि शून्य आयटीआरचे महत्त्व**

अनेकांचा असा समज असतो की, कर सवलतीमुळे कर देय नसल्यास आयटीआर भरण्याची गरज नाही. मात्र, तज्ज्ञांच्या मते जुन्या कर प्रणालीत २.५ लाख रुपये आणि नवीन कर प्रणालीत ४ लाख रुपये ही मूळ सवलत मर्यादा आहे. या मर्यादेपेक्षा एक रुपयाही जास्त उत्पन्न असल्यास आयटीआर भरणे कायदेशीररित्या आवश्यक आहे, भलेही कलम ८७ ए नुसार रिबेट मिळाल्याने तुमचा कर शून्य का असेना. याला ‘झिरो आयटीआर’ असे म्हणतात.

**पडताळणी आणि वेळेचे भान**

रिटर्न भरल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्याची पडताळणी (व्हेरिफिकेशन) करणे अनिवार्य आहे. हे काम आधार ओटीपी किंवा नेट बँकिंगद्वारे ऑनलाईन करता येते. पडताळणी न केल्यास विभाग रिटर्नवर प्रक्रिया करणार नाही आणि ते अमान्य मानले जाईल. तसेच, कोणत्याही नोटिशीला दिलेल्या मुदतीत उत्तर न दिल्यास दंड किंवा फी आकारली जाऊ शकते. महत्त्वाचे म्हणजे, वित्त वर्ष २०२५-२६ चे आकलन जुन्या ‘आयकर अधिनियम-१९६१’ अंतर्गतच होईल, नवीन २०२५ च्या कायद्यानुसार नाही. नवीन कायद्याचे परिणाम पुढील वर्षीच्या रिटर्नमध्ये दिसून येतील.

◆◆◆

# सिबिल अहवालातील ‘रिटन ऑफ’


आजच्या काळात गृहकर्ज असो, वाहन कर्ज किंवा वैयक्तिक गरजा, बँककडून कर्ज घेणे ही एक सामान्य बाब झाली आहे. मात्र, कर्ज घेणे आणि ते वेळेवर फेडणे या संपूर्ण प्रक्रियेत तुमची विश्वासार्हता मोजण्याचे एकमेव परिमाण म्हणजे तुमचा सिबिल स्कोअर. अनेकदा लोक आपली क्रेडिट रिपोर्ट तपासताना जुन्या थकीत कर्जासमोर ‘रिटन ऑफ’ असे लिहिलेले पाहून सुटकेचा निश्वास सोडतात. त्यांना वाटते की बँकेने त्यांचे कर्ज माफ केले आहे आणि आता एक रुपयाही देण्याची गरज नाही. मात्र, आर्थिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, हा कोणताही दिलासा नसून तुमच्या आर्थिक भविष्यासाठी असलेला हा एक मोठा धोक्याचा इशारा आहे.

जेव्हा एखादी व्यक्ती बँककडून कर्ज घेते आणि सलग १८० दिवस म्हणजेच सहा महिने हप्ते भरू शकत नाही, तेव्हा बँकिंग नियमांनुसार बँक त्या खात्याला ‘एनपीए’ म्हणजेच अनुत्पादक मालमत्ता घोषित करते. एनपीए घोषित केल्यानंतरही जेव्हा वारंवार नोटीस देऊनही वसुलीची शक्यता धूसर वाटते, तेव्हा बँक आपली ताळेबंद पत्रक स्वच्छ करण्यासाठी ते कर्ज नुकसान या रकान्यात टाकते. या तांत्रिक प्रक्रियेलाच बँकिंग भाषेत ‘रिटन ऑफ’ म्हणतात. याचा अर्थ बँकेने केवळ कागदोपत्री तो तोटा मान्य करून आपली कर दायित्वे कमी केली आहेत, परंतु कर्जदाराला कर्जमाफी दिलेली नाही. कायदेशीररित्या तुम्ही ते कर्ज फेडण्यास आजही जबाबदार असता.

क्रेडिट रिपोर्टमध्ये एकदा का हा दर्जा दिसला, तर त्याचे परिणाम दीर्घकालीन आणि अत्यंत विदारक असू शकतात. ‘रिटन ऑफ’चा थेट फटका तुमच्या सिबिल स्कोअरवर बसतो. या एका नकारात्मक नोंदीमुळे तुमचा क्रेडिट स्कोअर ३०० ते ४०० अंकांनी खाली कोसळू शकतो. स्कोअर कमी होणे याचा अर्थ असा की, बँकिंग व्यवस्थेच्या नजरेत तुम्ही एक अविश्वासार्ह ग्राहक बनला आहात. एकदा तुमचे कर्ज राईट-ऑफ झाले की, सिबिल अहवालावर पुढील सात वर्षांपर्यंत ही नोंद तशीच राहते. कोणताही नवीन बँक व्यवस्थापक हा रिपोर्ट पाहून कर्ज अर्ज त्वरित नाकारण्याची शक्यता असते. त्यांच्या मते तुम्ही ‘हाय रिस्क’ श्रेणीतील ग्राहक असता आणि वसुली संस्था या स्थितीतही तुमच्या दारावर धडक देऊ शकतात.

अनेकदा ‘सेटलमेंट’ आणि ‘रिटन ऑफ’ या दोन शब्दांमध्ये गल्लत होते. सेटलमेंट म्हणजे तुम्ही बँकेशी तडजोड करून मूळ थकीत रकमेपेक्षा कमी रक्कम भरून प्रकरण मिटवले आहे. बँकेच्या दृष्टीने काहीच न मिळण्यापेक्षा काहीतरी मिळणे चांगले म्हणून केलेली ही तडजोड असते. मात्र, ‘रिटन ऑफ’ म्हणजे बँकेने तुमच्याकडून वसुलीची सर्व आशा सोडून दिली आहे. या दोन्ही स्थिती नकारात्मकच आहेत आणि भविष्यात नवीन कर्ज मिळवणे या दोन्हीमुळे जवळपास अशक्य होऊन बसते.

तुमची आर्थिक विश्वासार्हता सुधारण्यासाठी काही ठोस पावले उचलणे




आवश्यक आहे. सर्वात आधी संबंधित बँकेच्या शाखेत जाऊन एकूण थकबाकी विचारा, ज्यात मूळ रक्कम, व्याज आणि दंड यांचा समावेश

**■ जाणून घ्या**

असेल. बँक तुम्हाला सेटलमेंटची ऑफर देईल, परंतु ती स्वीकारू नका. पूर्ण पैसे भरण्यावरच भर द्या. पूर्ण पैसे भरल्यानंतर बँकेकडून नो ड्यूज सर्टिफिकेट किंवा एनओसी घेणे अनिवार्य आहे. भविष्यात बँकेचा पैसा परत केला आहे, याचा हाच कायदेशीर पुरावा असेल.

पैसे भरल्यानंतर साधारण ३० ते ४५ दिवसांत बँक ही माहिती सिबिलला देते. जर त्यानंतरही तुमच्या रिपोर्टमध्ये बदल झाला नाही, तर सिबिलच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन तक्रार नोंदवा आणि तुमच्या एनओसीची प्रत अपलोड करा. सिबिल बँकेकडून खातरजमा करून तुमचा रेकॉर्ड सुधारेल. जेव्हा तुमच्या सिबिल रिपोर्टमध्ये ‘रिटन ऑफ’ च्या जागी ‘क्लोजड’ असे दिसू लागेल, तेव्हाच समजा की तुम्ही धोक्याच्या छायेतून बाहेर पडला आहात. पैशांची चणचण असणे ही गोष्ट वेगळी, पण बँकिंग व्यवस्थेत आपली साख गमावणे ही मोठी हानी आहे, कारण ती परत मिळवण्यासाठी अनेक वर्षे तपश्चर्या करावी लागते.

◆◆◆



# जुनी चांदी विकायची आहे?

देशातील चांदीच्या विक्रीची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी एमएमटीसी-पीएएमपी या सरकारी कंपनीने ‘सिलव्हर बायबॅक’ सेवा सुरू केली आहे. भारतातील अशा प्रकारची ही पहिलीच सेवा असून, याद्वारे ग्राहक आपले जुने चांदीचे दागिने, नाणी आणि लगडी थेट कंपनीला विकू शकतील. सध्या ही सुविधा नवी दिल्ली, कोलकाता, भुवनेश्वर, गुवाहाटी, लुधियाना, अहमदाबाद आणि मुंबई या सात शहरांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. आगामी काळात ही सेवा संपूर्ण देशात विस्तारली जाणार आहे.

**● शुद्धतेची तपासणी**

चांदीची विक्री करताना ग्राहकांना फसवणुकीची भीती राहू नये, यासाठी कंपनीने वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला आहे. ग्राहकांनी आणलेली चांदी कंपनीच्या केंद्रावर ‘एक्स-रे फ्लोरोसेंस’ या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे तपासली जाईल. या प्रक्रियेत चांदी वितळवून तिची अचूक शुद्धता मोजली जाते. ही संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली पार पडणार असल्याने यात कोणत्याही प्रकारच्या हेराफेरीला वाव राहणार नाही. शुद्धतेच्या तपासणीनंतर त्या दिवशीच्या बाजारभावानुसार चांदीची किंमत निश्चित केली जाईल.

**● थेट बँक खात्यात पैसे जमा**

व्यवहारात पारदर्शकता राखण्यासाठी कंपनीने रोख व्यवहार टाळून थेट बँक हस्तांतरणाची पद्धत स्वीकारली आहे. चांदीची किंमत निश्चित झाल्यानंतर संबंधित रक्कम ग्राहकाच्या बँक खात्यात तत्काळ जमा केली जाईल. आतापर्यंत चांदी विकण्यासाठी ग्राहकांना स्थानिक सराफांवर अवलंबून राहावे लागत असे, जिथे अनेकदा शुद्धतेवरून वाद किंवा योग्य भाव न मिळण्याच्या तक्रारी असायच्या. मात्र, आता सरकारी

**■ कमोडिटी**

कंपनीच्या या पुढाकारामुळे ग्राहकांना खात्रीशीर परतावा मिळणे शक्य होणार आहे.

**● रिसायकलिंगवर भर**

एमएमटीसी-पीएएमपीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी समित गुहा यांच्या मते, भारतीय कुटुंबांकडे मोठ्या प्रमाणात सोने आणि चांदी पडून आहे. दुसरीकडे, जागतिक स्तरावर इलेक्ट्रॉनिक्स, सौर ऊर्जा उपकरणे आणि विविध उद्योगांमध्ये चांदीची मागणी वेगाने वाढत आहे. चांदीची खाणकाम प्रक्रिया मागणीच्या तुलनेत संथ असल्याने, जुन्या चांदीचे पुनर्चक्रण (रिसायकलिंग) हाच भविष्यातील पुरवठ्याचा मुख्य स्रोत ठरणार आहे. हीच गरज ओळखून कंपनीने जुन्या चांदीची खरेदी सुरू केली आहे.

**● ग्राहकांसाठी महत्त्वाच्या सूचना**

जुन्या चांदीची विक्री करताना ग्राहकांनी काही तांत्रिक बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

विक्रीसाठी येणाऱ्या ग्राहकाकडे आधार कार्ड किंवा पॅन कार्ड यांसारखी ‘केवायसी’ कागदपत्रे असणे अनिवार्य आहे. तसेच, पैसे जमा करण्यासाठी ग्राहकाचे स्वतःचे बँक खाते असणे आवश्यक आहे. कंपनीच्या केंद्रांवर नाणी, बिस्किटे किंवा कोणत्याही प्रकारचे दागिने स्वीकारले जातील.

◆◆◆

# बाजार, सोने-चांदीत घसरण होतेय; मग पैसा गुंतवायचा कुठे?

पश्चिम आशियातील युद्धाच्या भडक्याने जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसला असून त्याचे पडसाद भारतीय बाजारपेठेतही उमटत आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ, शेअर बाजारातील घसरण आणि सोन्याच्या दरातील अस्थिरता यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून ‘डेट म्युच्युअल फंड’ या क्षेत्राकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. गुंतवणूक सल्लागार विनोद रावल यांच्या मते, डेट फंड हे प्रामुख्याने सरकारी रोखे, कॉर्पोरेट बॉण्डस् आणि ट्रेझरी बिल्स यांसारख्या साधनांमध्ये गुंतवणूक करतात. थोडक्यात सांगायचे तर, हे फंड सरकार किंवा विविध कंपन्यांना कर्ज स्वरूपात पैसे देऊन त्यातून नफा मिळवतात.

डेट फंडमध्ये लिक्विड फंड, मनी मार्केट फंड आणि गिल्ट फंड असे विविध प्रकार उपलब्ध आहेत. लिक्विड फंड हे अत्यंत अल्प कालावधीसाठी म्हणजेच ९१ दिवसांपर्यंतच्या गुंतवणुकीसाठी उपयुक्त ठरतात, कारण त्यातून पैसे काढणे अत्यंत सुलभ असते. दुसरीकडे, मध्यम ते दीर्घकालीन कालावधीसाठी शॉर्ट आणि मीडियम टर्म फंड अधिक परतावा देऊ शकतात, मात्र त्यात जोखीम काही प्रमाणात वाढते. बँक मुदत ठेव म्हणजेच ‘एफडी’ आणि डेट फंड यांच्यातील मूलभूत फरक स्पष्ट करताना अर्थतज्ज्ञ




शरद कोहली सांगतात की, एफडीमध्ये व्याजाचा दर निश्चित असतो, तर डेट फंडमधील परतावा बाजारातील रोख्यांच्या मूल्यावर अवलंबून असतो.

**■ गुंतवणूक**

कराच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास, १ एप्रिल २०२३ नंतर खरेदी केलेल्या डेट म्युच्युअल फंडवर केवळ विक्रीच्या वेळीच कर आकारला जातो. एफडीवरील व्याजावर दरवर्षी प्राप्तिकर भरावा लागतो, परंतु डेट फंडमध्ये गुंतवणूक कालावधीत कोणताही वार्षिक कर द्यावा लागत नाही, जो गुंतवणूकदारांसाठी फायदेशीर ठरतो.

ज्या गुंतवणूकदारांना शेअर बाजारातील मोठी जोखीम पत्करायची नाही, त्यांच्यासाठी हे फंड एक उत्तम सुरक्षित पर्याय आहेत.

डेट फंडामध्ये निप्पॉन इंडिया गिल्ट फंड, एसबीआय गिल्ट फंड, आयसीआयसीआय प्रूडेंशियल आणि आदित्य बिर्ला सन लाईफ यांसारख्या नामांकित फंडांचा विचार गुंतवणूकदार करू शकतात.

मध्यम ते दीर्घ कालावधीसाठी एसबीआय मॅग्नम मीडियम टू लॉन्ग ड्युरेशन फंड किंवा बॉण्ड फंड हे स्थिर परताव्यासाठी उत्तम पर्याय म्हणून समोर येत आहेत. बाजारातील अस्थिरतेपासून भांडवलाचे रक्षण करण्यासाठी आणि महागाईवर मात करण्यासाठी डेट फंड हा एक विश्वासार्ह मार्ग ठरत आहे.

◆◆◆

# मृत्यूपासून वाचण्यासाठी अरुणकाकांप्रमाणे दुसऱ्यांच्या विचारात जिवंत रहा

## डॉ. कुमार विश्वास यांचे आवाहन, स्व.अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ 'अपने अपने राम' राम कथा पहिल्याच दिवशी रंगली

नगर – श्रीराम व श्रीकृष्ण आले अन गेले ही. विश्व त्यांच्या शोकात राहिले नाही. त्यामुळे मृत्यू कोणालाही चुकलेला नाही, मात्र, मृत्यूपासूनही वाचता येते व दुसऱ्याच्या विचारात जिवंत राहता येऊ शकते. पण, त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी व छत्रपती शिवरायांसारखे लोकोत्तर जीवनकार्य करायला हवे, असे आवाहन कवी व रामकथाकार डॉ.कुमार विश्वास यांनी रविवारी सायंकाळी अहिल्यानगरमध्ये केले. अहिल्यादेवी व छत्रपती शिवरायांच्या विचारांना आदर्श मानून आयुष्यभर सामाजिक व धार्मिक काम केलेले स्वर्गीय माजी आमदार अरुणकाका जगताप त्यामुळेच अहिल्यानगरवासियांच्या मनात व विचारात जिवंत आहेत, असा विश्वासही विश्वास यांनी व्यक्त केला.

अरुणकाका जगताप यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त येथील काका ट्रस्ट व जगताप परिवाराच्या वतीने डॉ. कुमार विश्वास यांच्या 'अपने अपने राम' या राम कथेचे आयोजन आनंदधाम रस्त्यावरील राष्ट्रीय पाठशाळा मैदानात करण्यात आले आहे. त्याचे प्रथम पुष्प गुंफताना डॉ. विश्वास यांनी राम कथा कशी प्रत्येकाच्या जीवनाशी निगडित आहे याचे दाखले देत सविस्तर विवेचन केले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय विखे, आमदार सत्यजित तांबे, जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, पद्मश्री पोपटराव पवार, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आदी उपस्थित होते. रामकथेचे कथाकार डॉ. कुमार विश्वास यांचे नगरवासीयांच्या वतीने स्वागत व सन्मान श्रीमती पार्वतीबाई जगताप यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती देऊन केले. यावेळी डॉ.वंदना फाटके, डॉ.शशीकांत फाटके, सचिन जगताप, आ.संग्राम जगताप, सुवर्णा जगताप, शितल जगताप, परमेश्वरी व आराध्य जगताप आदींसह जगताप परिवराने केले. यावेळी रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी, मंदारबुवा रामदासी, अनुराधा नागवडे, बडीसाजन ओसवाल संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, सुनील रामदासी, राजेंद्र चोपडा आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक व भाविक उपस्थित होते.

प्रास्ताविकात आ.संग्राम जगताप यांनी सर्वांचे स्वागत केले, ते म्हणाले, वडिलांच्या स्मृतीनिमित्त कर्तव्य भावनेने राम कथेचे आयोजन या पावन संतांच्या भूमीत केले आहे. वडील वैकुंठवासी अरुणकाका जगताप अनेक वर्ष शहराच्या सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत होते. सर्वांच्या आशीर्वादाने विधान परिषदेवर दोन वेळा प्रतिनिधित्व त्यांनी केले. त्यांच्या स्मृती निमित्त त्यांनी ज्या अध्यात्मिक व धर्म क्षेत्रात काम केले, त्या क्षेत्राशी संबंधित उपक्रम करण्याचा आग्रह सर्वांचा होता. आमच्या परिवारात आजोबांपासून कुटुंबात आध्यात्मिक वारसा आहे व तो आमचा परिवार पुढे नेत असल्याचा अभिमान आहे, असे स्पष्ट करून आमदार जगताप म्हणाले, ही पुण्यश्लोक अहिल्यादेवींची भूमी आहे. या निमित्ताने चांगली व धार्मिक विचारधारा देण्याचा हा उपक्रम आहे. वडिलांच्या स्मृतीनिमित्त



काका ट्रस्टच्या वतीने माजी आमदार स्व.अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आयोजित डॉ. कुमार विश्वास यांच्या 'अपने–अपने राम' या संगीतमय रामकथेस उत्साहात प्रारंभ झाला. उद्घाटन प्रसंगी कथाकार डॉ. कुमार विश्वास यांचा सन्मान करताना श्रीमती पार्वतीबाई जगताप. डॉ.वंदना फाटके, सचिन जगताप, आ.संग्राम जगताप, सुवर्णा जगताप, शीतल जगताप आदी.

व समाजाप्रती आपण काही देणे लागतो या भावनेतून राम कथेचे आयोजन केल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. आमचा परिवार चुकीच्या गोष्टींना समर्थन देत नाही. अनेक जण अनेक काही करीत असतात पण तो विषय आमच्यापर्यंत आल्यावर तो समाज हिताचा नसेल तर आम्ही तो होऊ देत नाही, असेही त्यांनी सांगितले. या उपक्रमाच्या आयोजनासाठी कुटुंबातील सर्व सदस्य पाठीशी असल्याचा आनंद आहे. धर्मासमवेत चालण्याचा वडिलांचा विचार प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न या निमित्ताने करीत आहोत असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी डॉ.कुमार विश्वास यांनी विवेचनातून रामकथेतील अनेक जीवन दाखले दिले. त्यांनी प्रभू श्रीरामांच्या जीवनातील विविध पैलू अत्यंत समर्पक, आधुनिक संदर्भासह व तत्वज्ञानात्मक दृष्टिकोनातून उलगडले. 'अपने अपने राम' या संकल्पनेद्वारे प्रत्येकाच्या जीवनात रामाचे वेगवेगळे अर्थ कसे प्रकट होतात, याचे त्यांनी सखोल विश्लेषण केले. त्यांच्या कथनातून राम म्हणजे केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून आदर्श आचरण, कर्तव्यनिष्ठा, संयम, त्याग व मूल्याधिष्ठित जीवनपद्धतीचे प्रतीक असल्याचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला.

कथे दरम्यान डॉ. विश्वास यांच्या भजनांना उपस्थित श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. काव्य, विनोद, तत्त्वज्ञान व जीवनमूल्यांचा सुंदर संगम असलेल्या या रामकथेमुळे संपूर्ण वातावरण राममय, भक्तिमय व प्रेरणादायी झाले. माता जगदंबेचा अंश असलेल्या अहिल्यादेवींनी व छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रभू श्रीरामांचे राम राज्य प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. मानवी शरीर धर्मनिरपेक्ष नाही. झोपेतून उठल्यापासून सायंकाळी पुन्हा झोपेपर्यंत प्रत्येकाचे शरीर विविध शरीर धर्म पाळते. त्यामुळे राजसत्ता ही धर्मनिरपेक्ष असू शकत नाही. ती जेव्हा धर्मासमवेत चालते तेव्हा अहिल्यादेवींचे व छत्रपती शिवरायांचे शासन अनुभवास येते असे स्पष्ट करून विश्वास म्हणाले, राम कथा प्रत्येकाच्या जीवनाशी निगडित आहे राक्षसांना मारण्यासाठी विश्वमित्रांनी राजा दशरसाकडे त्याच्या चारही पत्रांची मागणी केली. त्यावेळी माझेच पुत्र का? असा सवाल दशरथाने केल्यावर विश्वामित्र म्हणाले, तुझ्या चारही पत्रांकडे तारुण्य, धन, प्रभुत्व व संपत्ती आहे. परंतु त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे म्हणजे मर्यादा, संकल्प, प्रतिभा व विनम्रता आहे. या पार्श्वभूमीवर आजची तरुण पिढी धिस इज माय लाईफ! असा घोष करते. तेव्हा ती मनोरुग्ण होत असल्याचे जाणवते. प्रत्येकाला आई वडील व समाज मोठा करतो. त्यामुळे प्रत्येकाचे जीवन हे देशाचे जीवन असते. हा विचार तरुणाई मध्ये रुजण्यासाठी राम कथा तरुणपणीच ऐकली पाहिजे.

पित्याने वनवास दिला तरी पित्याने मला जंगलाचे राज्य दिले असा विचार प्रभू रामाने केला. लंका विजयानंतर बिभीषणाचा अभिषेक लक्ष्मणाला करायला लावला. कारण वनवास काळात कोणत्याही नगरात जाणार नाही, असा शब्द रामाने वडिलांना दिला होता. यातून मर्यादा, वचनबद्धता व शौर्याचे दर्शन रामजीवनातून होते. गव्हातील किडा काढून टाकता येतो परंतु पाल्याचे चारित्र्य बिघडले तर दुरुस्त करणे कठीण जाते. यामुळे जीवन धर्म समजण्यासाठी युवा पिढीला राम शिकवला पाहिजे. राम हा मनुष्य आहे. तो अतिमानवीय नाही. त्याने कोणतीही चमत्कार केले नाहीत. आदर्श पुत्र, पती, भाऊ, मित्र व राजा याचे दर्शन त्याने जीवनातून घडवले. जीवनातील प्रत्येक समस्येचे उत्तर राम आहे, असे प्रतिपादन डॉ. विश्वास यांनी केले.

पाचशे वर्षानंतर अयोध्येत प्रभू राम स्थापन झाले आहे. हे काम सरकारने नाही तर सामान्यांच्या भावनेने व मदतीने झाले आहे. अशाच पद्धतीने मथुरा व काशीतही मंदिरे उभी राहतील असा विश्वास व्यक्त करून धर्म रक्षणासाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

### सुरेल भजनांनी वातावरण भक्तीमय

डॉ. विश्वास यांची राम कथा सुरू होण्यापूर्वी त्यांच्या समवेत आलेले गायक कलावंत नीरजा उपरेती, प्रियांशा शहा, अंकिशा श्रीवास्तव यांनी श्रीरामांचे सुरेल भजने सादर करून वातावरण भक्तिमय करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. प्रा.प्रसाद बेडेकर व सुशील कुशलेंद्र यांनी सूत्रसंचालन केले. रामकथेच्या यशस्वीतेसाठी काका ट्रस्टचे राजेश भंडारी, नगरसेवक विकी जगताप, अनिल मुरकुटे, गणेश गोंडाळ, शशीकांत घीगे, अजित जगताप, अनुप काळे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी नियोजन केले. उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवनगौरव पुरस्कारांचा २१ एप्रिलला सोहळा

## ज्येष्ठ साहित्यिका प्रा. मेधाताई काळे यांचा जीवनगौरवाने होणार सन्मान, प्रतिष्ठानची वार्षिक सभा व सन्मान सोहळ्याचे नियोजन

नगर – स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा प्रतिष्ठेचा शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवनगौरव पुरस्कार यावर्षी स्व. शिक्षण महर्षी मधुराजे मुळे तथा आबा यांच्या सातव्या पुण्यतिथी निमित्त २१ एप्रिल रोजी प्रदान करण्यात येणार आहे. याच दिवशी प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा देखील आयोजित करण्यात आली असून, हा संयुक्त कार्यक्रम दुपारी ३ वाजता कायनेटिक चौक येथील यश ग्रॅण्ड हॉटेल येथे पार पडणार आहे.

यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिका तथा महिला बँकेच्या संस्थापिका मा. प्रा. मेधाताई यशवंतराव काळे यांना प्रदान करण्यात येणार असून, त्यांच्या साहित्यिक आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा यावेळी गौरव केला जाणार आहे.



या सोहळ्याचे अध्यक्षस्थान लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे भूषविणार आहेत. तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विविध क्षेत्रातील शिक्षणप्रेमी, साहित्यिक व समाजबांधव यांचीही उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमात पुरस्कार वितरणा सोबतच प्रतिष्ठानच्या वार्षिक कामकाजाचा आढावा घेण्यात येणार असून, आगामी उपक्रमांची रूपरेषा देखील मांडण्यात येणार आहे. संस्थेच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरविण्याच्या दृष्टीने ही सभा महत्त्वाची ठरणार आहे.

या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे सर्व सभासद, हितचिंतक आणि समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष मुकेश माधवराव मुळे, उपाध्यक्ष दत्ता पाटील नारळे, सचिव प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे तसेच खजिनदार बजरंग पाडळकर व सर्व विश्वस्त यांनी केले आहे. कार्यक्रम व वार्षिक सर्वसाधारण सभा नियोजित वेळेतच सुरू होणार असल्याने म्हटले आहे.

# गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यावर छापा

## ४ जनावरांची केली सुटका, चाहूल लागताच आरोपीने केले पलायन

नगर – शहरात सुरू असलेल्या एका अवैध कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १९ एप्रिल रोजी पहाटे मोठी कारवाई केली. झेंडीगेट परिसरातील सुभेदार गल्ली येथे एका बंद खोलीत गोवंशीय जनावरांची निर्दयतेने कत्तल केली जात असल्याचे या कारवाईत समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपी सुफियान कुरेशी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू असतानाही सुभेदार गल्लीत जनावरांची कत्तल होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी १९ एप्रिल रोजी पहाटे पावणे सहाच्या सुमारास सदर ठिकाणी छापा टाकला असता, त्या ठिकाणी चार गोवंशीय जनावरे आणि कत्तलीसाठी लागणारे साहित्य आढळून आले. या कारवाईत २० हजार रुपये किमतीची चार जनावरे आणि वजन काट्यासह अन्य साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे. आरोपी सुफियान आयाज कुरेशी हा पोलिसांची चाहुल लागताच घटनास्थळावरून फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल विशाल आण्णासाहेब तनपुरे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार बनकर हे करत आहेत.

# राहुरी पोटनिवडणुकीत शंभर टक्के मतदान करावे

नगर – राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत मतदारांनी शंभर टक्के मतदान करावे यासाठी जिल्हा स्वीप समितीच्या वतीने २३ एप्रिलचा लोकशाही जागर हा व्यापक जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे.

मतदानाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करून निर्भय, निष्पक्ष व सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन स्वीप समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड यांच्या संकल्पनेतून १८ ते २२ एप्रिल या कालावधीत राहुरी विधानसभा मतदारसंघातील शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, महिला बचत गट तसेच आशा स्वयंसेविका यांच्या माध्यमातून विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत १८ एप्रिल रोजी मतदानाची शपथ दिली जाणार असून, १९ एप्रिल रोजी मतदान जनजागृतीसाठी डीपी स्टेटस ठेवणे, २० एप्रिल रोजी प्रसिद्ध व्यक्तींचे जनजागृतीपर व्हिडिओ प्रसारित करणे आणि २१ एप्रिल रोजी सोशल मीडियाच्या माध्यमातून निर्भय मतदानासाठी आवाहन करणे इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच २२ एप्रिल रोजी मतदानाची तारीख, वेळ व आवश्यक कागदपत्रांबाबत माहिती देण्यात येणार आहे.

यावेळी नागरिकांना आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निष्पक्ष व शांततापूर्ण निवडणुकीचे पावित्र्य राखू तसेच कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता निर्भयपणे मतदान करू अशी शपथ देण्यात येत आहे.

राहुरी विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी २३ एप्रिल रोजी मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) आकाश दरेकर, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) मीना शिवगुंडे, मतदारदूत डॉ. अमोल बागूल तसेच स्वीप समितीच्या इतर सदस्यांनी केले आहे.

# पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी किरण धारक, व्हाईस चेअरमनपदी सौ. आशा चौरे यांची बिनविरोध निवड

नगर – शहरातील पवन नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर यांच्या चेअरमन, व्हाईस चेअरमनपदाची नुकतीच निवड पार पडली. यावेळी पतसंस्थेच्या चेअरमनपदी किरण धारक तर व्हाईस चेअरमनपदी सौ. आशा चौरे यांची एकमताने निवड करण्यात आली.

निवडीनंतर चेअरमन किरण धारक यांनी सांगितले की, पतसंस्थेने नेहमीच ग्राहकांचे हित डोळ्यासमोर ठेवून पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा दिली आहे. संचालक मंडळाच्या सहकार्याने ही वाटचाल अधिक प्रभावीपणे पुढे नेऊ. सभासदांचा विश्वास आमच्यासाठी सर्वोच्च असून, संस्था





आर्थिकदृष्ट्या आणखी मजबूत करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

व्हाईस चेअरमन सौ. आशा चौरे यांनी सांगितले कि की, पतसंस्थेच्या माध्यमातून सामान्य जनतेला आर्थिक पाठबळ देण्याचे कार्य सुरूच राहील. नवीन योजनांच्या अंमलबजावणीसाठी आम्ही प्रयत्नशील राहू. चेअरमनसह सर्व संचालक मंडळाचा अनुभव आणि सहकार्यामुळे पतसंस्था नव्या उंचीवर नेणार, असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संचालक बाळासाहेब हुचे, दत्तात्रय डोळसे, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, संजय धोकरिया, मनोज क्षिरसागर, दीपक भागवत, अभय काळे आदी उपस्थित होते.

प्रास्तविक प्रसाद शिंदे यांनी केले. सुत्रसंचालन निशिकांत शिंदे यांनी केले. दत्तात्रय डोळसे यांनी आभार मानले. यावेळी जालिंदर चौरे, व्यंकटेश जोशी आदी उपस्थित होते.



निवडणूक आयोगाच्या मतदार यादी विशेष पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेत अहिल्यानगर शहरातील मतदारांची मतदार यादीतील नावे सुरक्षित व अबाधित राहण्यासाठी जनजागृती अभियान विरोधकांच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. या अभियानाचा नुकताच शुभारंभ करण्यात आला.

# मतदार यादी विशेष पुनरावलोकन मोहिमेच्या माध्यमातून विरोधी मतदारांची नावे गायब करण्याचे षड्यंत्र : किरण काळे

## महिला आरक्षणाच्या आडून देश तोडण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव फसला

नगर – सध्या महाराष्ट्रासह देशातील २२ राज्यांमध्ये मतदार यादी विशेष पुनरावलोकन मोहिम (एसआयआर) राबवली जात आहे. विरोधी मतदारांची नावे गायब करण्यासाठीचं हे सत्ताधाऱ्यांचं देश विरोधी षडयंत्र आहे. एसआयआर ही वोट चोरीची योजना आहे. निवडणूक आयोग आता वोट चोरी षडयंत्राचा सक्रिय भागीदार बनला असून हा लोकशाही वरील हल्ला असल्याचा आरोप, ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. आपली नावे गायब होणार नाहीत या साठी मॅपिंग करून घेत मतदारांनी जागरूक रहावे, असे आवाहन काळे यांनी केले आहे.

अहिल्यानगर शहरातील मतदारांची मतदार यादीतील नावे सुरक्षित व अबाधित राहण्यासाठी जनजागृती अभियान विरोधकांच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. त्याच्या शुभारंभ प्रसंगी काळे बोलत होते. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, अनंत गारदे, रावजी नांगरे, पै. दीपक भोसले, सुशांत म्हस्के, प्रतीक बारसे, राम वाणी, राम झिने, प्रा. अमोल खाडे, रोहन शेलार, मतीन शेख, विकेश गुंदेचा, गणेश आपरे, शंकर आव्हाड, नलिनी गायकवाड, नीता बर्वे, अर्चना गायकवाड, शारदा वाघमारे, उषा भगत, शैला लांडे, रजनी ताठे, मीना रणशूर, रूपाली आपरे, लोकेश बर्वे, विजय शिरसाठ, चंद्रकांत उजागरे, जयराम आखाडे, विनोद शिरसाट, राम धोत्रे, सोनू देशमुख, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, निलेश लांडे, आप्पासाहेब लांडगे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

किरण काळे म्हणाले, एसआयआर प्रक्रिया घाईघाईने आणि नियोजित रीतीने राबवली जात आहे, ज्यामुळे खऱ्या मतदारांचे, विशेषतः गरीब, दलित, ओबीसी, अल्पसंख्याक आणि स्थलांतरित नावे यादीतून काढली जात आहेत. जी मतं सत्ताधाऱ्यांच्या विरोधात पडतात ती हेरून वगळली जात आहेत. ही मत चोरीला झाकण्यासाठी योजना आहे. निवडणूक आयोग दबावाखाली काम करत आहे. ही मोहीम म्हणजे मतदार यादी स्वच्छ करण्याचे नाव आहे, पण प्रत्यक्षात खऱ्या मतदारांना वंचित ठेवण्याचे षडयंत्र आहे. आपली नावे मतदार यादीत अबाधित राहण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहावे. मॅपिंग करून घ्यावे. आपल्या केंद्राच्या बीएलओशी संपर्क साधावा. या प्रक्रियेत काही अडचणी आल्यास मतदारांनी आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन काळे यांनी केले आहे.

### देश तोडण्याचे षडयंत्र फसले

अनेकांच्या बलिदानानंतर स्वातंत्र्य मिळाल. त्यानंतर संघराज्य पद्धतीने लोकशाही आधारित संसदीय प्रणाली देशाने स्वीकारली. मात्र महिला आरक्षणाचा बागुलबुवा उभा करून लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेच षडयंत्र आखलं होतं. मात्र देश तोडण्याचे हे षडयंत्र विरोधी पक्षांनी मोडून काढलं. महिला अत्याचाराच हथराव, उन्नाव प्रकरण, मणिपूर मध्ये महिलांची नग्न धिंड, महिला खेळाडूंवर अत्याचार होत असताना नारी शक्तीचा ढोंगी दिंडोरा वाजवणारे मूग गिळून गप्प का होते ? घरगुती गॅस तूटवड्या मुळे आजही अनेक माता भगिनी मोठ्या त्रासाचा सामना करत आहेत. लाडक्या बहीण योजनेची मदत वारंवार वेळेत मिळत नाही. योजना बंद पडायच्या मार्गावर आहे. मात्र मनुवादाचे पुरस्कर्ते असणारे महिला विरोधी सरकारचे षडयंत्र विरोधी पक्षांच्या एकजुटी मुळे फसले असल्याचे प्रतिपादन, किरण काळे यांनी यावेळी केले.

# गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक प्रकरणातील आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

नगर – गुंतवणूकदारांना जादा परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी सुशीला दर्शन जगताप यांचा अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त सत्र आणि विशेष न्यायाधीश एम. एच. शेख यांनी फेटाळून लावला आहे. तोफखाना आणि एमआयडीसी पोलीस ठाण्यात त्यांच्यावर दोन वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. या दोन्ही प्रकरणांत फिर्यादींच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अभिजित पुप्पाल यांनी तर सरकार पक्षाच्या वतीने सरकारी वकील एम. व्ही. दिवाने यांनी कामकाज पाहिले.

आरोपी सुशीला जगताप यांचा मुलगा राहुल (आरोपी क्र. १) आणि सून एंजल (आरोपी क्र. २) हे स्वतःला एका कंपनीचे मालक असल्याचे भासवून गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करत असत. गुंतवणूकदारांना कमिशनचे आमिष दाखवून त्यांच्याकडून मिळालेली रक्कम आरोपी सुशीला जगताप यांच्या बँक खात्यात जमा केली जात होती फसवणूक उघडकीस आल्यावर सुशीला जगताप या 'ज्येष्ठ नागरिक आणि महिला' असल्याचा फायदा घेत अटकपूर्व जामीन मिळवण्याचा प्रयत्न करत होत्या मात्र, अशा प्रकारच्या फसवणुकीचे अनेक गुन्हे दाखल असून यात सुशीला यांचा सकृतदर्शनी सहभाग असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

२४ लाख ७० हजार रुपयांच्या फसवणूक याप्रकरणी योगी महेंद्र सबलोक (वय ४७, रा. सर्जेपुरा, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुसऱ्या प्रकरणातील राजेश बन्सल या फिर्यादीने तब्बल ४ कोटी ७० लाख रुपये सुशीला जगताप यांच्या बँक खात्यात ऑनलाईन ट्रान्सफर केले होते. यापैकी ३ कोटी ९० लाख रुपये त्यांना परत मिळाले. उर्वरित ८० लाख रुपये आणि कमिशनची रक्कम वारंवार मागणी करूनही आरोपींनी परत केली नाही. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

दोन्ही प्रकरणांत सुशीला जगताप यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. परंतु, फिर्यादींचे वकील ॲड. पुप्पाल यांनी न्यायालयात हस्तक्षेप करून जोरदार आक्षेप नोंदवला. हा केवळ दिवाणी स्वरूपाचा व्यवहार नसून अशा फसवणुकीच्या अनेक घटना आहेत. उर्वरित रकमेची वसुली आणि सखोल तपासासाठी आरोपीच्या पोलीस कोठडीची गरज असल्याचे न्यायालयाने ग्राह्य धरले आणि १८ एप्रिल रोजी दोन्ही जामीन अर्ज फेटाळून लावले.




मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

